# हलकं फुलकं

लेखिका : मधू शिरगांवकर

अग्गोबाई उंदीर?? आई मी पळून चाललेय !! बाबाना सांगून जा ग !! शिशुममगाई !!कसचं कसचं !! आरशात मी कशाला पाहू ग !! ही आली बघ ठो दे बाई!! ओह मॅन !नॉट अगेन ! बाला बाला !ये तो है शैतान का साला ! अगं ए , योगा मॅट वर घोरतेस काय? शरीर हाच एक भास! मग तो जाड काय आणि बारीक काय? वीज गोलमटोल बल्ब मधेही असते आणि शेलाट्या [illegible] आड गावांचे [illegible] तरी जात नाही ती सवय![illegible]टची खुर्ची नामक यमाचा रेडा!तुमची स्माईल [illegible] किलिंग ब्युटीफुल करून टाकते! लेकीची सासू घुम्मी आहे बाई!! किलिंग हा शब्द फक्त खरा, बाकी सब मोहमाया ! तुम्ही वैकुंठवासी होईपर्यंत तुम्हाला नाकारता येत नाहीत अशी दोन ठिकाणं म्हणजे बँक आणि किराणा मालाचं दुकान !आता तोंडाचा नुसताच आ वासलेला !!मधू मावशी , स्माईल प्लीज !! ए, अवधूत, मधूमावशी बघ कशी चेटकिणीसारखी ? शरी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# हलकं फुलकं

लेखिका : मधू शिरगांवकर

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# हलकं फुलकं

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

### पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

### आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

### पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वत: जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# हलकं फुलकं

लेखिका : मधू शिरगांवकर

Plot 13, Mangaldham, Pune 411038

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप – 09822208197

ई मेल -- madhushirgaonkar@gmail.com

मुखपृष्ठ व आतील चित्रे: मधू शिरगांवकर (काही चित्रे गुगलवरून साभार घेतली आहेत)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : ६ मार्च २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखिकेची ओळख



सौ मधू शिरगांवकर,

(Mrs. Mrinmayee Shirgaonkar )

वय ५४ वर्षे.

पेशाने फार्मास्युटिकल ट्रेनर आणि कन्सल्टंट.

प्रमाणपत्रधारक योगशिक्षिका : Yog Daily हे फेसबूक पेज चालवते. त्यावर योगविषयक माहिती, त्यातील चुकीचे समज व काही योगासनांची प्रात्यक्षिके असा विडिओ बेस्ड कार्यक्रम करते.

इविद्यालोक या स्वयंसेवी संघटनेची सक्रिय स्वयंसेविका. टीम विजन या दृष्टी आव्हानितांसाठी कार्य करणाऱ्या संस्थेसाठी पुस्तकवाचन.

पती, सासू , व आईवडील यांच्यासह गेली २८ वर्षे पुण्यात वास्तव्य. मुले नोकरीनिमित्त बाहेरगावी असतात.

पन्नासाव्या वर्षी लेखनास सुरवात केली. लेखन करतानाचा आनंद सर्वात महत्वाचा आणि वाचकांची दाद ही सगळयात मोठी पावती असं मानते. वाचता वाचताच लेखनाची सुरवात झाली.

जवळपास ५० लघुकथा, पाच लघुकादंबऱ्या, अनेक ललित लेख, व सध्या एका कादंबरीचे लेखन सुरू आहे.

कॉलेजमध्ये असताना केलेला अभिनय, नेपथ्य, दिग्दर्शन यांचा लेखन करताना नकळत उपयोग होतो. शास्त्रीय संगीत परमेश्वराच्या किंचित का होईना जवळ घेऊन जातं असा विश्वास वाटतो.

- "माझा मराठीचा बोल" दिवाळीअंकात २०१७, २०१८, २०१९, २०२० च्या आवृत्यांमध्ये कथा व लेख प्रकाशित.
- "श्री व सौ" या २०१९ च्या दिवाळीअंकात तीन लघुकथा 'कथात्रयी' या सदरात प्रकाशित.
- निनाद या २०२० मध्ये अमेरिकेतून प्रसिद्ध झालेल्या विशेष अंकात लघुकथा प्रकाशित.
- ग्रहसंकेत या मासिकामध्ये श्री रमणमहर्षींवरील लेख प्रकाशित जून २०२०
- प्रतिबिंब ही कादंबरी नुकतीच छापील स्वरूपात मातृभारती प्रकाशनातर्फे प्रकाशित झाली.

E mail : madhushirgaonkar@gmail.com

Mobile number: 9822208197

# मनोगत

रोजचा दिवस काही ना काही नवं घेऊन येतो. अनुभव देऊन जातो. तो क्षण जगतानाचे आपण आणि नंतरचे आपण यांत नक्कीच एक सूक्ष्म बदल झालेला असतो. तो बदल टिपताना, मागे वळून पाहताना, उरतं, ते फक्त हसू.

असेच काही हसरे किस्से, तुमच्यासाठी या लेखांद्वारे आणले आहेत. यांत काही, अगदी जवळच्या नातेसंबंधांची वीण, तिच्या उलट सुलट धाग्यांच्या रचनेबरोबर मांडण्याचा प्रयत्न आहे. तर काही "अगदी हद्द झाली बुवा"असे म्हणायला लावणारे अनुभव आहेत.

एक ताजी नजर या घडून गेलेल्या गोष्टींवर टाकली की त्या काही वेगळंच सांगू लागतात. त्या घटनेच्या फ्रेमच्या बाहेर पडून त्यांच्याकडे पाहता यायला हवं मात्र, मग त्या घटनांवर आणि स्वतःवरही हसता येतं.

माझ्या लेखणीला आज कथा, कादंबरीचा राजमार्ग सोडून, ही ललितलेखांची हिरवी पायवाट चोखाळावीशी वाटली ती केवळ आजपर्यंत वाचकांनी दिलेल्या प्रेमामुळेच.

काल्पनिक कथा लिहिणं, आणि प्रामुख्याने स्वानुभावावर आधारित लेखन करणं यात बराच फरक आहे हे या लेखनादरम्यान जाणवलं. स्वतःवर हसणं वाटतं तेवढं सोपं नाहीच. तो 'स्व' म्हणा की 'अहं' मध्ये येतोच. त्याला चुचकारून, जरा बाजूला केला की मग मात्र निखळ आनंद मिळतो, असंही लक्षात आलं.

ईसाहित्य नेहमीच नवनवीन प्रयोगांना पाठींबा देतं हा नेहमीचा अनुभव याही वेळी खरा ठरला. त्यांचे मनःपूर्वक आभार.

माझा हा पहिला ललितलेखसंग्रह तुम्हा सर्वांपुढे ठेवताना मला अत्यंत आनंद होत आहे.

तुम्हालाही काही हलके फुलके क्षण या लेखांमुळे अनुभवायला मिळाले तर माझा हा प्रयोग यशस्वी झाला असं मी समजेन.

____मधू शिरगांवकर

# अर्पणपत्रिका



माझ्या आयुष्यात आनंद आणि हास्याची उधळण करणारे

सोहम, साधना,

पूजा, केदार,

यांना हे पुस्तक अर्पण करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

# हलकं फुलकं

अनुक्रमणिका


१. तह

२. आई

३. पुढे मागे

४. ओला की सुका

५. फेबूमत्वे

६. वेडीचाबाजार

७. गणुगप्पा

८. व्यायाम मी आणि अध्यात्म

९. आडनावे

१० ऋणानुबंध

११. लकी अनलकी

१३. ट्रॅफिक स्वगत


आऽऽऽऽऽई!

# तह

शेवटी मी त्याच्याशी अलिखित, अबोल, मन ही मनमें तह केला आणि आजतागायत दोन्ही बाजूंनी आपापल्या मर्यादा, सीमारेषा सांभाळत, घातलेल्या अटी काटेकोरपणे पाळत आम्ही सुखाने नांदतो आहोत. कोणाशी? हा हा! सांगते ना .

त्याचं काय झालं, आम्ही या घरात २००४ साली राहायला आलो, त्या रात्रीच प्रचंड पाऊस पडला. आणि त्यांचं कुटुंबच सरळ घरात शिरलं. सामानाच्या हलवाहलवीने दमून, पावसाबरोबर पडलेल्या थंडगार हवेने आम्ही सगळे अंमळ गाढच झोपलो होतो. मग त्यांनी आम्हाला उठवायची तसदी घेतली नाही. ते ही कोपऱ्यात निजून गेले.

सकाळी आम्ही जागे होण्यापूर्वीच निघूनही गेले. यथावकाश सामान वगैरे लावून आम्ही स्थिरस्थावर झालो. मुलांना त्यांच्या वेगवेगळया खोल्या मिळाल्याने ती जाम खुशीत होती.

संध्याकाळी शुभंकरोती वगैरे म्हणून मुलगी (तेव्हा वय वर्ष ७,) अगदी झोकात , “स्वैपाक होईपर्यंत मी पुस्तक वाचत माझ्या खोलीतच बसते” असं म्हणत आपल्या खोलीत गेली आणि त्याने तिला पहिले दर्शन दिले. काहीच क्षणात तिच्या किंकाळ्या बाहेर ऐकून आम्ही आत गेलो तेव्ही ती बेडवरून उठून टेबलवर चढून किंचाळत होती.

“अगं काय झालं?”

“तिकडे उंदीर आहे.”

उंदीरचा नुसता उं ऐकल्याबरोबर मुलगाही तिच्या पाठोपाठ बेडवर चढला.

“अगोबाई उंदीर? मी आमचं दार लावून घेते/ घेतो आधी,” असं म्हणत सर्वच जण अचानक नाहीसे झाले. उरले फक्त मी आणि तो उंदीर.

मी झाडू घेऊन आले तसा घाबरून तो मुलीच्या कपाटात शिरला. मुलाने पटकन कपाट लावून टाकलं. मी म्हटलं निदान जेवणं नीट पार पडू देत.

जेवणं झाल्यावर मात्र, मी, झाडू, काठी, कापड असं सगळं सामान घेऊन लेकीच्या खोलीत शिरले. बाकीचे सगळे मेंबर

आपापल्या खोल्यांमधे चिडीचूप. लेकीने दादूला गूळ लावत त्याच्या खोलीत प्रवेश मिळवला होता.

बंद खोल्या सोडून, सगळं घर आमची युद्धभुमी बनलं.

प्रथम मी लेकीच्या कपाटाचं दार उघडून पाहिलं. साहेब कुठेच दिसेनात. मग काठीचं शींग फुंकून सरळ सरळ आव्हान दिलं. पण त्याने गनिमी कावा स्विकारला. मी लेकीचे कालच छान घड्या केलेले कपडे एक एक करत त्याची सह्याद्रीची दरीखोरीच बाहेर उपसली. आणि जे मला दिसलं त्याने माझी सटकली! लेकीच्या दोन नव्या कोऱ्या जीन्स, एक फ्रॉक,नवाकोरा घागरा, अशा अनेक गोष्टींचे अंश मामाने पोटात रिचवून त्यांना छिद्रांकित करून ठेवलं होतं अवघ्या अर्ध्या पाऊण तासात. वर आणि काठीला घाबरून भरपूर लेंड्या टाकल्या होत्या ते वेगळंच!

मग ही रणरागिणी पेटली आणि तिने काठीने त्याच्यावर कपाटातच वार केला. पण हा मूषक भलताच चपळ निघाला. काठीचा वार चुकवून तो माझ्या पायांवरच उडी मारून बेडखाली लपला. मी त्या लिबलिबित स्पर्शाने शहारून जोरात किंचाळले!

“अगं सांभाळून गं! पडूबीडू नकोस.” बंद खोल्यांच्या आतूनच मला काळजी दर्शवण्यात आली. याने तर मी भलतीच वैतागले.

मग तू तरी राहशील किंवा मी तरी, असा पण करून, मी झाडू, काठी, पाय, शिवाय तोंडाने आरडा ओरडा असं सगळं करत मामावर तुटून पडले. मी बेड बाहेर ओढला तसा तो घाबरून बाहेर पडला नि पटकन फ्रीजखाली घुसला. फ्रीज बाहेर ओढल्यावर हॉलमधे सोफ्याखाली. मी त्याच्यामागोमाग, एक, एक दरवाजा बंद करत रणभूमीचं क्षेत्रफळ कमी कमी करत एक उत्कृष्ट खेळी केली होती.

मग तो आणि मी यांच्यात लपाछपी, शिवणापाणी, अडथळ्यांची शर्यत असे अनेक डाव त्या उरलेल्या रणभूमीवर खेळून झाले.

पीच मामाच्या दृष्टीने फारच सुकर होतं. तो कधी सोफ्याखाली, कधी शोकेसखाली, तर कधी टीपॉयच्या आडव्या पायाच्या वळणावर लपून मला चॅलेंज करत होता. राज्य सतत माझ्यावरच होतं.

मग मी एका हातात काठी, एका हातात झाडू असं घेऊन हुतूतू करत त्याच्यावर चाल करून गेले, तेव्हा मात्र त्याला

दरवाजातून बाहेर पलायन करत आऊट होण्याशिवाय पर्यायच उरला नाही.

दरवाजा घट्ट बंद करून, पंखा फुल्ल स्पीडवर सोडत मी हुश्श्य करत सोफ्यावर बसकण मारली.

बराच वेळ बाहेर काहीच रणधुमाळी ऐकू येईना तशी “सारख्या सूचना" हळूच दार उघडून बाहेर येत, “गेला का गं?” असं विचारत्या झाल्या. आणि मग “किती गं पसारा हा” हे वाक्य बोलल्या क्षणी माझा चेहरा बघून त्यांनी उलटं गिळून टाकलं.

पोरं हळूच बाहेर पडली त्या मामासारखी, भिंतीला चिकटून. आत गेल्याबरोबर लेकीने गळा काढला .. “माझे... कपडे!”

यानंतर त्याने बदला घेतल्यासारखे एक दिवस दर्शनी दार कोपऱ्यात कुरतडले. माझ्या महत्वाच्या कागदपत्रांच्या रांगोळ्या केल्या. अजून काही कपड्यांच्या चिंध्या झाल्या.

मग विषप्रयोग झाला. पोळी पळवली विषाची, पण गेला कुठे? सगळं शोधलं. कुठेच नाही. तिसऱ्या दिवशी दुर्गंधीने घरात थांबवेना. शोध शोध शोधला. नुसती अदृश्य दुर्गंधी. मग अचानक “इ इ इ" करत मुलगा बाहेर. मामाने शेवटचा श्वास सोडण्यासाठी दादूच्या दोन वह्यांमधली जागा शोधली होती.

“हे भगवान!”

"आम्हाला नाहीच राहायचं इथे, जुन्या घरीच जाऊ!" पोरांनी धोशा लावला.

मग पिंजरा लावून झाला. आजकालच्या उंदरांचाही आय क्यू वाढलाय. त्याने पिंजऱ्यातली पुरी पळवली. अडकला नाहीच. रोज काहीतरी कुरतडून ठेवायचा. मग एक जालीम उपाय सुचवला कोणीतरी. एक चिकट मॅट मिळते ती ठेवा. झालं, मॅट ठेवली. सकाळी महाराज मॅटला चिकटलेले सापडले.

पण सुटण्याची केविलवाणी धडपड सुरू होती. अत्यंत केविलवाणे डोळे रोखून तो माझ्याकडे पाहत थरथरत होता. मला पोटात कसंतरीच झालं. त्याला त्या मॅटवरून काढून सोडून द्यावा असा विचार करून मी ग्लव्जही घातले. पण उचलायचा प्रयत्न केल्यावर लक्षात आलं पार कातडी घट्ट चिकटलीय. काढायला गेले तरी उचकटून येईल. केविलवाण्या नजरेने तो पाहतच होता. मला त्यादिवशी मी जगातली सर्वात क्रूर बाई आहे हे जाणवलं. गत्यंतर नव्हतं. तशीच मॅट उचलून बाहेर लांब गवतात नेऊन ठेऊन आले. कावळे टोची मारून त्याला संपवणार होते, यात काहीच शंका नव्हती. पण माझ्यामुळे हे जीवंत मरण त्याच्या वाटेला आलं होतं. त्याची असहायता पार आतपर्यंत भेदून गेली मला.

त्यादिवशी ठरवलं यापुढे परत नाही. काय वाटेल ते होवो.

मग हळू हळू लक्षात आलं. त्याचे आत येण्याचे अनेक मार्ग बंद केले. त्यातून आल्याची चिह्न दिसलीच तर रात्री घरातले दिवे सुरू ठेवून दरवाजा उघडा ठेवू लागले. सेफ्टी डोअर असल्याने ते शक्य होतं. मामा उजेडाकडून अंधाराकडे जाऊ लागला. कपाटं सतत नीट बंद, वर उघडं काहीच न ठेवणे हे ही करू लागले.

हळू हळू त्याचं येणं बरंच कमी झालय. आला तरी काही नुकसान करत नाही. वरच्या टेरेसमधे ओला कचरा खतासाठी साठवलेला असतो तिथे अनायसेच त्याचं पोट भरतं. मग घरात शिरायची गरज नसते.

बाकीच्यांना सांगितलंय, फारतर हुसकावून लावेन, त्याच्या पुढचे उपाय करायचे तर तुम्ही करा, मी नाही. अर्थातच परत कोणी नाव नाही काढलं कधीच.

मी तुला मारणार नाही, तू माझं नुकसान करायचं नाही, असा अलिखित तह झालाय आमच्यात.

आणि आम्ही दोघंही तो तंतोतंत पाळतो.

# आ. आ. ना. आ.

# आई

या विषयावर इतकं भरभरून लिहीलं जातं बऱ्याचदा, कधी कधी तर फार फार टोकाचं! इतकं, की ते वाचल्यावर, मला तरी, मी अगदी नालायक ( ना-लायक) आई आहे असा चक्क साक्षात्कारच होतो.

म्हणजे बघा हं! सारख्याच प्रसंगात ना-लायक आई ( ना. आ., म्हणजे मी ) आणि आदर्श आई (आ. आ., म्हणजे मी नक्की नव्हे ) यांच्या प्रतिक्रिया कशा असतात पाहा .

प्रसंग १

लेक: आई, मला कसंतरीच होतय गं! (वय वर्ष कितीही, ५ - ५०+)

मी: हो का? काय होतंय?

लेक: माहीत नाही. पण कसंतरीच होतय!

मी: हं, पाणी पी जरा! बरं वाटेल!

विषय संपला!

आदर्श आई: अगंबाई, काय होतय? ताप नाही ना? पोट दुखतंय का? ये बरं इकडे! बस माझ्या जवळ! कसं गं माझ्या बाळाला बरं नाही? (वय वर्ष कितीही बरं का ! ५०+ पण असू शकतं )

झोप तू, मी सरबत करून देते. गरम गरम वरण भात खाशील का नाहीतर?

प्रसंग २

लेक: लेकीला बक्षीस मिळालं, किंवा लेक स्टेजवरून डान्स करून खाली उतरते किंवा काही दिवसांचा प्रवास करून लेक घरी परत येते हे आणि असं काहीही!

मी: वा वा , छान! / ते अमुक तमुक जरा अजून बरं करता आलं असतं तुला/ प्रवासात काही त्रास नाही ना? कपडे धुवायला टाका, पण वेगळे ठेवा. जेवण खाण झालंय की बसतेस लगेच?

विषय संपला

प्रसंग तेच

आ.आई: तिन्ही प्रसंगी प्रतिक्रिया सेम: डोळे भरून येणे, लेकीला मिठीत घेणे, तिने जगंच जिंकलं आहे व तिच्याखेरीज या अख्ख्या दुनियेत दुसरं कोणीही हे करू शकत नाही असे भाव!

प्रसंग ३

लेक: फोनवर: आई, माझा डबा/चार्जर /डिसेक्शन बॉक्स / हॉल तिकिट घरी विसरलंय गं!

मी: ठीक आहे. बाहेर फक्त फळं खायची.(लेक ऐकणार नाही हे माहीत असतंच, पण तरी शाब्दीक शिक्षा केल्याचा आनंद. ) / बरं झालं, फोन बंद करून ठेवा, अभ्यास बरा होईल जरा / जरा इतरांबरोबर मैत्रीपूर्ण संबंध असतील तर देईल कोणीतरी वापरायला डिसेक्शन बॉक्स, लहानपणापासून कानी कपाळी ओरडतेय बॅग आदल्या रात्री भरून ठेवत जा! / स्कॅन पाठवते तुझ्या पसाऱ्यात हॉल तिकिट सापडलं तर. नाहीतर काय मग, आहेच पुढचं वर्ष!

आ.आई: (सर्व वस्तुंच्या बाबतीत प्रतिक्रिया सेमच! ) अगं बाई, आता गं? लेकरू गं माझं! काळजी नको हं करू, पाठवते मी

लगेच कोणाला तरी! तू अजिबात टेंशन घेऊ नकोस! आलेच, निघाले मीच! बिचारं माझं बाळ, किती टेंशन आलं असेल!

प्रसंग ४

लेक: आई, मला अमुक तमुक असं असं बोलला/ली/ले/ल्या. मला प्रचंड राग/दु:ख झालं.

मी: कशावरून हा विषय निघाला? तू काय बोललीस आधी/नंतर? तुला तुझी काही चूक वाटतेय का यात? नसेल तर नक्की काहीतरी चुकतय. एका हाताने टाळी वाजूच शकत नाही. एकदा स्वत:चं काय चुकलं हे कळलं की सुधारणा करून मोकळी हो! समोरच्याला शांत पण स्पष्ट शब्दात कल्पना दे की त्यांचे शब्द चुकताहेत, बोलण्याची पद्धतही! "नो डील" हा मार्ग सतत उपलब्ध असतो हे विसरू नकोस, पण तो अगदी अंतीम उपाय आहे हे ही लक्षात असू दे! काहीही झालं तरी आम्ही आहोतच. पण आपली लढाई आपणच लढायला शिकावी हे उत्तम. फोन कर नंतर!

आ. आई: अग्गंबाई!!!!! असं कसं बोलू शकतं कोणी? सोन्यासारखी मुलगी माझी! इतकी हुशार, इतकी सालस, या माणसांना (प्रोफेसर /बॉस / सासू/ ऑफिस मधले/घरचे ) काय म्हणायचं? गुणांची कदरच नाही कशी ते. कसे गं हाल चाललेत माझ्या बाळाचे! कर बाई सहन! इलाज काय दुसरा! येतेस का काही दिवस इकडे राहायला? हुंदका! फोन करत राहा बाई, आता माझा जीव थाऱ्यावर नाही राहायचा! (पुढचे काही दिवस सतत आईचे डोळे पाणावलेले! )

हं! हे आणि असे कितीतरी किस्से! पण कधीतरी वाटतं, ती आ.आ. होऊन पाहावंच का एखाद्या जन्मी? छे! अपने बस की बात नव्हेच!

# पुढे मागे

वय वर्षे ७५: कुठे निघालात?

वय वर्षे ८१: दूध आण म्हणालीस ना?

वय वर्षे ७५: अहो आणलत ते काय मगाशी! काय असं करता अहो? निघाले तरातरा छत्री घेऊन.

वय वर्षे ८१: आणलं? कोणी आणलं?

वय वर्षे ७५: अहो तुम्हीच नाही का आणलंत!

वय वर्षे ८१: छे! मी गेलोय कुठे बाहेर अजून?

वय वर्षे ७५: बर्र, भुताने आणलं असेल मग! बोलतच नाही मी आता काही. डोकं फिरवणार तुम्ही माझं!

वय वर्षे ८१: मी काय आता वेगळं फिरवणार तुझं डोकं? मूळात धड ....

वय वर्षे ७५: उगाच माझ्या डोक्यावर घसरायची गरज नाहीय बरं का! सांगून ठेवते आधीच! आपलं तपासून या जरा! मिनिटा मिनिटाला विसरता!

वय वर्षे ८१: मी काही विसरत नाही. सगळं चांगलं लक्षात आहे माझ्या!

वय वर्षे ५३: काय गं आई? काय झालं? भांडताय कशाला दोघे?

वय वर्षे ७५: भांडतोय कुठे? तुझं आपलं वेगळंच एकेक! घोड्यावर बसून येते आणि उगाच ओरडू नका, भांडू नका .. सुरू करतेस लगेच!

वय वर्षे ५३: वरपर्यंत आवाज येतात तुमचे!

वय वर्षे ७५: हो का? मग दारं खिडक्या लावून घ्या तुम्ही! कसलेही आवाज नकोहेत यायला!

वय वर्षे ५३: बरं बाई! कसले प्रेमळ संवाद चालले होते म्हणे?

वय वर्षे ७५: डोंबलाचे प्रेमळ संवाद! अगदी हळू आवाजात, तुला काय सांगतेय नीट ऐक! हल्ली जरा फिरल्यासारखेच वागताहेत! (बोटाने डोक्याकडे गोल गोल ॲक्शन! ) लक्षात काही राहत नाही. उगाच ओरडत बसतात माझ्यावरच!


दूध घेऊन येतो
अहो ! विसरलात का? आणलत ना मगाशी ?

वय वर्षे ८१ : ( वय वर्षे ७५ बाथरुममधे गेल्यावर बोलतात, अगदी खाजगीतल्या आवाजात,) ती सारखी औषधं खाऊन खाऊन हिच्या डोक्यावर जरा परिणाम झालाय बरं का! काहीही बोलते. घटकेत जा दूध आणा, घटकेत म्हणते हे काय आत्ताच घेऊन आलात! समोरच्याला वेडं करून सोडेल ही बाई!

वय वर्षे ५३: ( फ्रीज उघडून पाहते! दुधाच्या पिशव्या दिसतात दोन! ) बाबा अहो दूध आहे खरंच फ्रीजमधे.

वय वर्षे ८१: बघ, पटलं ना तुला. फ्रीज उघडून बघायचंही नाही. म्हणायचं दूध आणा.

वय वर्षे ५३: ऑ ! असोच! चहा देऊ का करून आलीय तशी?

वय वर्षे ८१: टाक अर्धा कप! तिलाही कर! चालतो तिला चहा कधीही!

वय वर्षे ५३: ( चहाचे कप घेऊन बाहेर येते) बाबा, कुठे निघालात?

वय वर्षे ८१: अगं दूध घेऊन येतो! बाईसाहेबांना कायम ताज्या दुधाचा, ताजी पिशवी फोडून केलेला चहा लागतो. पारा चढायचा उगाच!

वय वर्षे ५३: ( कपाळावर हात मारत )ओ बाबा, असं काय करता अहो?

वय वर्षे ८१: मी काय केलं आता?

वय वर्षे ५३: नाही नाही, काही नाही. आता आधी हा चहा घ्या, मग बघूया.

वय वर्षे २३: (वरूनच जोरात आवाज देते! ) आई, अगं परवा माझं स्पीडपोस्टने हॉल तिकिट आलं ना? कुठे ठेवलंस?

वय वर्षे ५३: हॉल तिकिट ना, अगं ते काय ....... या इथे..... अं ?कुठे ठेवलं बरं? नीट लगेच सापडावं म्हणून ठेवलं बघ. श्या! कपाटात ठेवलं का? की तुझ्या कपाटात? का लॉकर मधे?

वय वर्षे ७५ : हरवलस ना ? अगदी बापाच्या पावलावर पाऊल आहे ग बाई.

# ओला_की_सुका

“अरे अरे थांब, हात धर बरं माझा.” समुद्राची आई म्हणाली. “किती धावतोस अरे, थांब ना जरा.”

“असंच करतेस तू नेहमी. तो किनारा केव्हाचा वाट पाहत बसला असेल, मी नाही गेलो वेळेत तर रुसून बसेल, मग खेळायचा नाही माझ्याशी.”

“काय खेळता रे?”

“ओला की सुका!”

“हा कसला खेळ म्हणे?”

“असतो ना, मज्जा येते.”

“हो? कसा खेळता ?”

“हे हे, आईला खेळ माहीतच नाही, शेम शेम!”

“मग तू सांग ना!”

“बघ हां, माझ्यावर राज्य आलं की मी धावत धावत जाऊन किनाऱ्याला भिजवतो. दर वेळी जास्त जास्त भिजवतो. कधी कधी ना मी माझ्या हातांना, धावताना इतकं जोरात हलवतो आणि

धावतो फास्टात की असा उंच हवेत उसळतो आणि खळ्ळकन फुटतो किनाऱ्याच्या अंगावर जाऊन, सगळा अख्खा भिजतो तो मग. पूर्ण भिजला की तो आऊट. मग त्याच्यावर राज्य.”

“हो? मग तो कसं घेतो राज्य?”

“अगं मी कसा त्याला आऊट करतो ना? तसं त्याला पण मला आऊट करायचं असतं, पण मी मागे मागे लागतो पळायला, तो कितीही धावला तरी मी जास्तच मागे जातो, पण मग मी भिजवलेला किनारा अख्खा वाळतो. मग मी आऊट. मग परत माझ्यावर राज्य.”

“ओह असं असतं होय हे ओला की सुका?

तरीच एवढी उत्साहाची भरती आलीय एका मुलाला!”

“हो.... अगं, मज्जा ना? चल ना गं, सोड ना माझा हात. जाऊ देत मला. राज्य आहे माझ्यावर. नाहीतर किनारा चिडवेल, राज्य आल्यावर ते घ्यायला आला नाहीस म्हणून.”

# फेबुमत्वे

## (फेसबूक वरील व्यक्तिमत्वे)

फेसबूक कळायला लागून त्यावर हातपाय मारण्यापर्यंत मजल जायला मला बराच वेळ लागला. मग हळू हळू इथले शिष्टाचार, व्यक्तिमत्वे दिसू, समजू लागली. अशीच काही खास फेबुमत्वे!

फेबूमत्व १ : शीशूममगाई

ही मंडळी सकाळपासून रात्रीपर्यंतचा मिनिटामिनिटाचा अहवाल देत असतात. म्हणजे उठलो... ( सर्व ‘लो’ च्या जागी ‘ली’ पण वाचावे )एक गुड मॉर्निंग, विथ गुलाब ... चहा... (फोटू ) जाऊन आलो... (फोटू?? नाय नाय ) वा काय हलकं वाटतय.. नाश्ता ... (फोटू पायजेलंच ) हापसात पोचलो ... तिला पायली , कसचं कसचं जालं ... बॉस भडकला ... जे१ केलं .... फायली इकडून तिकडे पाठवल्या ... निघालो... ट्रॅफिक अपडेट... घरी पोहोचलो... पोराबरोबर खेळलो पुन्हा जे१ केलं (फोटू ) झोपतो आता.... गुडनाईट मेसेज विथ चंदामामा फोटू

हुश्श्य!

फेबूमत्व २ : सदाकावले

सतत कशा ना कशाने कावलेले. आज काय सरकारच्या निर्णयांवर कावलेले... तर कधी रस्त्यांच्या खड्ड्यांवर, गर्दीवर, गणपती उत्सवातील आराशींवर.. ट्रॅफिकवर.. पावसावर .. उन्हावर .. उडणाऱ्या धुळीवर.. लोकांच्या पोस्ट्सवर, त्यांवर येणाऱ्या कमेंटसवर, क्रिकेटवर, दिपीकावर, पाहिलेल्या सिनेमावर...

कारण महत्वाचं नाहीच! कावणं महत्वाचं.

फेबूमत्व ३ : कसचं कसचं

ही मंडळी फारच भारी. काहीही केलं की अपडेट टाकतील. मग कोणी दोन कौतुकाचे शब्द बोललं की पार आपण कसे क्षूद्रच आहोत हे हिरहीरीने पटवून देत बसतील. सतत आपलं कसचं कसचं! अरे एवढंच क्षूद्र वाटतंय तर अपडेट दिला कशाला त्या कामाचा?

फेबूमत्व ४ : आरशात मी कशाला पाहू गं!

रोज नवनवे, वेगवेगळ्या बॅकग्राऊंडचे, वेगवेगळ्या पोषाखातले आपले प्रोफाईल पिक्चर्स बदलणारे. पण यांचा तसा त्रास काही नाही बरं का! तुम्ही लाईक केलाच पाहिजे फोटो अशी

काही अट नाही. ते बदलणारच! कधी हसरे, कधी मान तिरकी, कधी चक्कं जमिनीवर पालथं पडून, कधी घोड्यावर बसून, कधी हवेत उडताना, कधी मिटलेल्या डोळयांचाच.

फेबूमत्व ५ : मि. एक्स

नो प्रोफाईल पिक. फुलं, पानं, डोंगर दऱ्या, पुतळे, इमारती, देवदेविका, नटनट्या, वाद्य, प्राणी, पक्षी, वस्तू, चहाचा कप, झेंडा, चेहऱ्यातील एखादाच अवयव, पाठमोरे, असलं काहीही त्यांचं प्रोफाईल पिक. प्रोफाईल वर माहितीही तशीच. फक्त नाव .. ते ही कोडनाव ! पण यांचाही त्रास असा नाहीच!

फेबूमत्व ६ : आवाहनकार/ आव्हानकार

सतत कसली तरी आवाहनं करणारे किंवा आव्हानं देणारे मदतीची आवाहनं, गो ग्रीन आवाहनं, हे बघा ते बघा आवाहनं, स्त्रीदाक्षिण्याची आवाहनं, सतत कसली ना कसली आवाहनं! हे तरी ठीकंच!

आव्हानवाले तर.. कसले कसले फोटो पोस्ट करण्याचं आव्हान, फोटोविरहित पोस्ट करा असं आव्हान, माझ्या पोस्टवर

कमेंट करा मग हे कॉपी पेस्ट करा तुमच्या वॉलवर ... आव्हानंच आव्हानं!

असोच!

फेबूमत्व ७ : कौतुक करा हो कौतुक करा

बागेतल्या फुलांचे फोटो, केलेल्या पदार्थांचे फोटो, बाग कोमेजली तरी फोटो, बाग बहरली तरी फोटो, कधी कधी विडीओ, पोरं परदेशी गेली म्हणून गळा काढून रडणं ही इथेच, पोरं दिवाळीदसऱ्याला परतली की आनंदातिशयाने नाचताना फोटू, एकुण काय, आलं मनात केलं पोस्ट! आलं मनात केलं पोस्ट. वॉल आपलीच आहे.

फेबूमत्व ८ : तुम बने हम बने एक दुजे के लिये

नवऱ्याचा वाढदिवस, बायकोचा वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस! तोबा तोबा!

कसलं ते भरभरून प्रेम! किती ते कौतुक! किती ते शब्दबंबाळ मेसेजेस! अगागागा! जगात असला दुसरा किंवा असली दुसरी कोणी अस्तित्वातच नाही! जपून बरं! डायबेटीस व्हायचा येवढं गोड्ड गोड्ड ... असोच.

फेबूमत्व ९ : पर्दानशीन

कायम पडद्यामागून दोन डोळे रोखलेले. या नजरांमधून काहीही सुटत नाही. तुम्ही निश्वास सोडलात तरी या डोळ्यांना कळतं. या डोळ्यांची दोन पाखरे सतत मागावर.

सगळीकडे नजर ठेऊन.

कोणी काय पोस्टलं, कोणी लाईक केलं, कोणी हार्ट दिला, कोणी व्हॉव केलं, कोणी कोणी निग्लेक्ट मारला? कोण कोण काय काय कमेंटलं! सगळं स्टॅटिस्टीक्स तोंडपाठ! याआधी किती वेळा काय काय पोस्टलं वॉलवर. आजची पोस्ट टाकण्यामागचा अमुक तमुक व्यक्तीचा उद्देश काय! कोण तो कोण तिच्याच पोस्टवर कमेंटतोय? कोण ती कोणाच्या पोस्टवर सतत हार्ट देते!कसलं भारी लक्ष! सायबर क्राईम ब्रांचला यांची खरी गरज आहे.

लोकांची मानसिकता शोधतात म्हणे पोस्टवरून ही मंडळी! डेडीकेटेड, बिना कोणत्याही प्राप्तीच्या आशेशिवाय, सेवाभावी वृत्तीने हे लोक्स रेकॉर्ड ठेवतात, फेबु वरच्या प्रत्येक घटनेचं!

तुम्हाला सापडतात का पाहा अजून अशी फेबुमत्वे!

# वेडीचा बाजार !

“बाबा, तुम्हाला काय वाटतं? आईला डॉक्टरांना दाखवूया का?”

माझी लेक बाबाला अत्यंत काळजीच्या स्वरात विचारत होती. कारण होतं माझी त्या दिवसाची खरेदी!

पण तो पक्का लोणच्यासारखा मुरलेला. “नको काळजी करूस. आठवड्यात बंद होईल सगळं!”

“अहो पण ‘एकतारी’?”

“असू दे गं. बघशील तू.”

मी त्या आठवड्यात अमॅझॉनवरून एकतारी, रविवारपेठेतून डफ आणि घुंगरू आणले होते. छोटा डग्गा शोधत मी बरीच वाद्यांची दुकानं पालथी घातली होती. पण ‘तसा' मिळत नव्हता.

'तसा' म्हणजे कसा?

अगदी तसा जो पार्वती बौल कमरेला बांधून नाचत नाचत गाते. नाही पाहिलीत, ऐकलीत तिला? एकदा पाहा आणि ऐकाच. प्रेमात पडाल. गॅरंटी आहे आपली.

लांबसडक, पायांपर्यंत पोहोचणाऱ्या जटा, सहसा पांढरी किंवा केशरी घोट्यापर्यंत बांगला पद्धतीने नेसलेली साडी, गळयात एकतारी, पायात घुंगरू,/ पट्ट्या, किंवा घागऱ्या. कमरेला डुग्गा, आणि या सर्वांना साथीला घेऊन तारसप्तकात त्या परमशक्तीला आळवणारा पार्वतीचा मधाळ स्वर! त्यात रसगुल्ल्यापेक्षाही मधूर बांगला भाषेचा गोडवा.

आहाहा! डोक्यात भिनणारं, तुम्हाला तुमच्यापासून काही क्षण अलग करणारं बौल संगीत!

प्रथम हिला 'बनियान ट्री' या संस्थेने सादर केलेल्या 'रुहानियत' या कार्यक्रमात पाहिली, ऐकली. कार्यक्रम होता बंडगार्डनच्या लॉनवर ओपन स्टेजवर.

वेडं करून गेली मला.

तेव्हा यू ट्यूब वगैरे नव्हतं. वेळही नव्हता. पण मनाच्या तळात तो मधाळ स्वर, ते सर्व वाद्यांना एकत्र नांदवणारं पार्वती नावाचं खूळ, दबा धरून बसलेलंच होतं.

मग अचानक यू ट्यूबवर काहीतरी शोधताना ती समोर आली आणि मी जाम खुश!

तिचं ‘घीर घीर घीरी नाचे’ काय किंवा ‘किछू दिन मोने मोने’ काय. अशी काही तल्लीन होते ती, जणू तो श्रीरंग उभाच आहे समोर.

स्वर असा कारंज्यासारखा उसळतो तिचा. ठेक्यावर, तालावर प्रचंड प्रभुत्व. हजारो लोकांसमोरचा कार्यक्रम असो की एखाद्या झोपडीवजा आश्रमातला. तिचं तल्लीन होणं तसंच असतं. संपूर्ण एकतानता.

तो डुग्गा अजून मिळाला नाही, नाहीतर...

आणि मग सगळं बाकीचं हळूच माझ्या वेड्या पेटाऱ्यात मी बंद करून ठेवलं. पोरीचा बाबा म्हणाला तसं अगदी आठवड्यात नाही, पण बऱ्यापैकी हातपाय मारून झाल्यावर. पण मनातल्या मनात मी पार्वतीच्या बरोबरीने अगदी तिच्यासारखंच सगळी वाद्य मस्त तालासुरात वाजवत गात नाचत असते. काश, तिची ती एकतानता, तल्लीन होणंही उतरेल माझ्यात एक दिवस.

हे वेड असं सहज जाणाऱ्यातलं थोडंच आहे!

दुसरीने असाच एक दिवस कब्जा घेतला मनाचा. कबीराला “उड जायेगा” म्हणत कुमारजींनी वसवलं होतंच मनात. पण हिने ठसवलाच. कित्येक रात्री मग कबीरमय! कबीराला समजून

ऐकायचं तर रात्रंच हवी आपल्याजवळ. आणि अबिदा परवीनचा इबादती स्वर. (असं गुलजार म्हणतात.)

कबीर समजून असं म्हणायचं. पण खरा कधी समजतोय तोच एक जाणे. निदान शब्द मनात शिरून त्यांचा थोडा तरी माग घ्यायला मनात शांतता हवीच.

पण हिने असं काही गायलं कबीराला की विचारूच नका. उत्तम गायकीला जराही हावी होऊ न देता तिने कबीराला सरळ उतरवला मनात, विचारातही. साथीचा तबला मात्र सणसणीत. तुम्ही त्याकडे दुर्लक्ष करूच शकत नाही. झांज आणि बाकी वाद्यही.

पण शेवटी फक्त मनात उरतात ते कबीराचे अफाट शब्दं आणि अबिदाचा स्वर.

तिने कबीर गायला ! बस्स! बाकी आयुष्यात काहीच नाही गायलं तरी ठीक!

मन लागो यार फकिरीमें!! मटकी तुटेपर्यंत हे वेड असंच राहणार!

या वेडातच तर ते दौडतं आहे!


आई, मी पळून चाललेय !

मध्यंतरी एका वेगळ्याच गोष्टीने वेडं केलं होतं. गल्लीबॉय सिनेमा पाहून परत यायला निघाले. डोक्यात, ‘अपना टाईम आयेगा' घुमत होतं सारखं. रीक्षावाला आरशातून जरा घाबरूनच पाहत होता. मी बहुधा त्या गल्लीबॉय सारखे हातवारे करत, खांदे हलवत....

घरी आले तरी रॅप काही पिच्छा सोडेना. ओट्यापाशीही तेच. सासूबाई पाणी पिण्याच्या बहाण्याने येऊन पाहून गेल्या. बहुधा सासऱ्यांना त्यांनी खूण केली असावी. ते साधे होते मनाने.ते काही बहाणा न करता पाहून गेले.

पुढे आठवडा १५ दिवस अपना टाईम घुमत होतं. शेवटी एक तद्दन रॅप लिहून, ते गाऊन आणि ऐकवून, मित्रमैत्रीणींवर अत्याचार केले, तेव्हा कुठे त्या वेडाने हे झाड सोडलं.

पण ही रॅप बिप तात्कालिक वेडं, येतात, जातात. पोरांनाही सवयीची आहेत. आईची तशी अनेक वेडं त्यांच्याही परिचयाची आहेत.

उदा:

सुगरण आई: नवनवे पदार्थ करकरून पोरांना बेजार करणारी.

ओसिडीग्रस्त आई: सगळीकडचा पसारा अचानक नाहीसा व्हावा अशी इच्छा करत एकदम स्वच्छता मूडमधे येऊन घरादाराला सळो की पळो करून सोडणारी. हल्ली काही वर्ष हे वेड गायब झालंय. माझी मैत्रीण राजेश्वरी म्हणते तसा पसाराच प्रसन्न वाटू लागलाय बहुधा.

फुलवेडी आई: असतील नसतील ती बागेतली सगळी फुलं घरभर मांडून त्यांच्याकडे पाहत बसणारी.

चित्रकला शिकायचीच म्हणून हट्ट करून बसलेली : वैतागून लेकीने लहान मुलांचं चित्र रंगवायचं पुस्तक आणि क्रेयॉन दिले आणून!

मेकओव्हरने पछाडलेली: मग पोरीची खैर नसते. एकदम मॉड बनायचं असतं आईला, मग मुलीला धरते वेठीला. बरीच कॉस्मेटिक्स, हल्लीच्या फॅशनचे ड्रेसेस , हाय हील्स अशी बरीच खरेदी होते आणि घरी आणल्याबरोबर ते या वेड्या बाईला फारच ‘बुढ्ढी घोडी लाल लगाम वाटू ‘ लागतात...

बेपर्वा त्रयस्थ आई: कशावरूनही न ओरडणारी, आई भूक लागलीय असं म्हटल्यावर, कर मग काहीतरी, मलाही चालेल म्हणणारी.

एकदा ही बाई लक्षंच देत नाही म्हटल्यावर लेक वैतागून म्हणाली, 'आई मी पळून चाललीय!' मी लेखनात मग्न . सवयीने म्हटलं "हं! बाबांना सांगून जा!" काय भडका उडालाय म्हणता !

पण खरं सांगू का? पाळावीत ही अशी काही वेडं. खरं आयुष्य यातच दडलेलं आहे.

नेमनियमाने सततच जर जगायचं असेल तर त्यात मजा काय? होय की नाही सांगा.

आपला टाईम आला बा
जीवन एक खेळ बा
शाळा बिळा शिकली बिकली
नोकरी बिकरी केली बा
पैसा बियसा साठला बिठला
घर बंगला बांधला बा
हा हा हा हा
आता, आता?
आपला टाईम आला बा
स्वैपाक पोरं सासू बा
बॉस ऑफिस प्रवास बा
फायली बियली मोप बा
कॅन्सल बिन्सल ट्रेन बा
हा हा हा हा
आता, आता?
आपला टाईम आला बा
सायकल , स्कुटर कार बा
आता सोबत शोफर बा
कडक बिडक सूट बा
वरती टाय बो बा
सगळे करती सलाम बा
हा हा हा हा
आता आता?
आपला टाईम आला बा




पन्नास अधिक झाले बा
पोट ढेरी सुटली बा
डोळे गेले खोल बा
चेहरा तो सुरकतला बा
बिपी शुगर गोळया बा
हा हा हा हा
आपला टाईम आला बा
गाणंबिणं शिट्टी बिट्टी
पावा बिवा वाजवू बा
कंबर बिंबर हलवू बा
नाच आम्ही करूच बा
आंबट चिंबट जोक बा
दोस्तांची तर खेचू बा
पन्नास गेले तेल लावत
आम्ही अजून तरूण बा
हा हा हा हा
दमलो म्हणत नसतो बा
आम्ही तर हिरवे बा
हॉटेल आणि पार्ट्यांमध्ये
आमचाच तर धिंगाणा बा
हा हा हा हा
आता आता?
आपला टाईम आला बा

# गणुगप्पा

परवा बऱ्याच दिवसांनी जवळच्या गणपतीमंदिरात गेले. बाप्पा घुश्श्यातच! गेले नव्हते ना. दिवाळीत पण शुभेच्छा देणं नव्हतं जमलं.

म्हटलं "सॉरी बाबा सॉरी! नाही रे जमलं! पण आलेय ना आता! हे बघ लालबुंद जास्वंद पण आणलाय वाहायला. हो, हो, हळद कुंकू पायांवरच वाहते, नाही डोळ्यात जाऊ देणार तुझ्या!"

बेसनाचा लाडू बघून स्वारी जरा मुडात आली. मग जरा इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या.

"हं! आली बघ ठो दे बाई!"

"कसलं रे हे नाव? 'ठो दे' असं आडनाव असतं?"

"नाही गं! जा बस तिकडे, बऱ्याच दिवसांनी आलीस. गंमती खूप दिसतील तुला."

मी ही मग माझ्या नेहमीच्या ठिकाणी कट्ट्यावर खांबाला टेकून कुतुहलाने बघत बसले.

ती गणुबाबाची खास भक्तीण बघायचीच होती मला.

आली, पिशवीतून नारळ, खडीसाखर, उदबत्त्या असं बरंच काही काढून आधी साग्रसंगीत पूजा केली. मग नमस्कार करायला पुढे झुकली आणि बघते तर काय, पायांवर डोकं टेकवण्याऐवजी मस्त बाप्पाच्या डोक्याला डोकं आपटलं तिने! एकदा नाही चांगलं तिनदा! लहान मुलाला ‘ठो दे , ठो दे' करतात तसं! बाप्पाने तिथूनच मला ओठ काढून दाखवला. प्रचंड हसायला यायला लागलं मला. पण एकटीच हसत बसले असते तर कठीणच झालं असतं की नाही? रुमाल तोंडावर धरून कसबसं हसू दाबलं.

तेवढ्यात बाप्पाचा आवाज आला. “आल्या बघ थापट्याबाय!”

‘आता हे काय नवं?’मी सरसावून बसले!

या बाई तोंडाने काहीतरी पुटपुटतंच आल्या. मग बाप्पाजवळ जाऊन रागावल्यासारख्या जोरजोरात पुटपुटत मूर्तीला हळदकुंकू वाहिलं, पेढे ठेवले समोर आणि एखाद्याला झोपेतून उठवायला जसं थापट्या मारतात तशा लागल्या की मारायला. एकदा एका मांडीवर, मग दुसऱ्या, मग खांद्यावर. मग त्यांनी पेढा तोंडाजवळ नेला बाप्पाच्या.


ही आली बघ
ठो दे बाई !

मला वाटलं गपकन् खातोय काय? तो मात्र 'बघितलंस ना ' असं डोळ्यांनीच विचारत होता. मग तो पेढा समोर ठेवून परत डोक्यावर थोपटून त्या प्रदक्षिणा घालायला गेल्या. नशीब बाप्पाचं!

"ओह मॅन ! नॉट अगेन!"

"का रे? काय झालं?"

तेवढ्यात तो माणूस पुढे आला. बाप्पाला लाजवेल अशी गरगरीत ढेरी. पुढे वाकायचं ठरवलं तर काटकोनाच्या पुढे जाऊ शकला नसता. पण आज तो नुसते हात जोडून गेला.

"नशीब!" बाप्पा म्हणाला.

"मागच्या वेळी अडकला ना, साष्टांग घालायला गेला आणि बोटीसारखा डोलारा झाला दोन मिनिटं. खालीवर खालीवर! आणि मग बिचाऱ्याचं तोंड आपटलं गं! उठताही येईना त्याला. मग इतरांनी हात देऊन उठवला, माहिताय?"

"काय सांगतोस काय? कठीण परिस्थिती की रे बाबा!"

"हो ना गं!"

"चला, निघते रे, उशीर किती झाला बघ!"

"बस गं! आता तो पोरेला गुरूजी येईल, त्याची गंमत बघून जा!"

“पोरेला गुरूजी? आजोबा कुठे आहेत मग?”

“अगं ते गेलेत बाबांना भेटायला काशीला. मग हा येतो मला आंघोळ घालून जेवण भरवायला.”

तेवढ्यात आलाच तो. संध्याकाळ असल्याने फक्त सायंपूजा आणि आरती असते. नेहमीचे आजोबा गुरूजी बरीच स्तोत्र म्हणतात. प्रसाद देतानाही पठण सुरू असतं! छान प्रसन्न वाटतं.

हा गुरूजी असेल जेमतेम विशीचा. मोबाईल बघत बघतच आला. पायरीला अडखळला. कोपऱ्यातली मुलं खुसूखुसू हसली, त्यांच्याबरोबर बाप्पाही तोंडावर सोंड आडवी धरत हसला. तुंदील तनू गदगदा हलली.

मग गाभाऱ्यातच मोबाईल चार्जींगला लावून त्याने स्तोत्र म्हणायला सुरवात केली.

प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम्

भक्तावासं स्मरेआं अं आव आं सिद्धये

प्रथमं वआंअं अंआंअं आंनद्वितियम्

तृतियं आंअंक्षांचं आंअंआंअं चतुर्थकम्

असं नावांच्या जागी आंउं आंउं करत त्याने स्तोत्र पूर्ण केली. मोबाईलवर एक नजर ठेवत तो तीर्थप्रसादही देत होता. कोणी हार दिला तर नेम धरून बरोब्बर गणुबाबाच्या गळयात थ्रो होत होता. गणूबाबा दचकत होता.

मधेच मोबाईल वाजायला लागला त्याचा “बाला बाला,ये तोहै शैतान का साला, इसको तो है रब ने पाला , बाला बाला...“

कोपऱ्यातली पोरं लागली की नाचायला!

गणूबाबाने चक्क कान बंद करून घेतले सुपासारख्या कानाच्या पाळया कानावर पाडून. गुरूजीने पट्कन फोन कानाला लावला आणि काहीतरी बोलून पट्कन बंदही केला. तोपर्यंत निरनिराळे भाव चेहऱ्यावर दाखवत भक्तगण तीर्थप्रसादासाठी ताटकळले होते.

मग शहाण्या मुलासारखा त्याने फोन सायलेंटवर टाकला.

“गुर्जी कवा यायचे व्हं?” पागोट्याने विचारलंच!

“एक महिना तरी लागेल.” पोरेला गुरूजी वैतागून बोलला.

गणूबाबाने माझ्याकडे पाहून डोळा मारला. मला आणखीनच हसायला यायला लागलं.

मग आरती झाली. प्रसाद वाटला. सगळे एक एक करत बाहेर पडले.

गुरूजींनी आरती फिरवल्यावर गणूबाबाने उलट्या दिशेने मान गोल गोल फिरवत मला भरपूर हसवलं परत एकदा!

सगळे गेल्यावर पोरेला गुरूजी गाभाऱ्यात गेलेला पाहून इतका वेळ ताटकळत कोपऱ्यात बसलेली ती फाटक्या कपड्यातली पोरं सूळकन पुढे आली धावत. पटापट लाडू, पेढा, साखरफुटाणे खोबरं, कोंबले गेले तोंडात. गपागप खाऊन टाकलं सगळं त्या पोरांनी.

पोरेला गुरूजी ओरडत बाहेर आला तशी गेली पळून.

त्याने मग समोरची चिल्लर, काही चूकार नोटा गोळा केल्या आणि निघाला.

मलाही निघावंच लागलं. जाताना वळून पाहिलं तर बाप्पा मस्त पोटावरून सोंड फिरवत तृप्तीची ढेकर देत होता!!

# व्यायाम....मी....आणि....अध्यात्म

वेळ रात्रीची साडेदहा...

'उद्या सकाळपासून व्यायाम सुरू व्हायलाच हवा बरं का!' मी स्वत:लाच बजावते. 'पहिली गोष्ट, सकाळी उठल्याबरोबर फोन हातात घ्यायचाच नाही. काही कोणी वाट पाहत बसलं नाहीय तुझ्या गुड मॉर्निंगची! उठल्याबरोबर गरम पाणी पिऊन बूट चढवून सरळ बाहेर पडा.'

'असं नाही जमायचं. टाईमटेबलच हवं!' मनातली शाळकरी मुलगी अजून काही जात नाही. मग मस्तपैकी सोमवार,मंगळवार,असे कॉलम. सकाळी साडेपाचपासून मिनिटा मिनिटाचं गणित मांडून आठवडा सजतो.

व्वा! रंगीत कागद, रंगीत पेनं वापरून झक्कास टाटे(टाईमटेबल) तय्यार होऊन सॉफ्टबोर्डवर लावणार तेवढ्यात धोक्याची घंटा वाजते!

'नको, इथे नको, नवऱ्याने पाहिलं तर हात धुऊन मागे लागायचा उगाच. हे लिहीलेलं झालं का? ते लिहीलेलं झालं का? मुकादम होता बहुतेक मागच्या जन्मी!'

मग कपाटाच्या दरवाजाच्या आतल्या बाजूला मस्तपैकी सजतं ते. ‘हुश्श्य! आपलं आपणच लक्ष ठेवायचं स्वत:वर! ‘

एवढं होईस्तोवर साडेअकरा वाजलेले असतात. लॅपटॉप बंद करून झोपणार तर मगाचचा ‘कॅंडी क्रश सोडा’ चा दुपारी अर्धवट राहिलेला गेम ओपन होतो स्क्रीनवर. ‘अरे सुटत होती ही लेवल. चला पार करून झोपू! ‘

असं म्हणत किमान अर्धा तास त्यात जातोच!

‘श्या! काय हे! उद्या डिलीटच करते हा गेम! नो नॉनसेन्स विल बी टॉलरेटेड मधू! इनफ इज इनफ!’ रागावले की जास्तच विंग्रजी येतं बॉ तोंडात!

पण इनफ इज इनफ काय असतं? काहीही!!

मग पहाटे पाचला उठण्याचा मनोभावे संकल्प करून, गजर बिजर लावून, स्वारी मस्त झोपी जाते!

क्वचितच पडणारी स्वप्न आज फार प्रेमाने डोळ्यांना मिठीत घेतात.

मी मस्त वॉक, योगासनं, वगैरे डौलाने करताना त्यात दिसते मला . स्वप्नात कधीच मी मला बेढब दिसत नाही. ऑलवेज स्लीम अँड ट्रीम बरं का! ते असो.

तर काय सांगत होते? हां!

मग स्वप्न पाहता पाहता सकाळ, सॉरी, पहाट होते. गजर वाजतो. दोनदा स्नूज केल्यावरही तिसऱ्यांदा वाजतो! ‘श्या! काय कटकट आहे!

अरे हो की! खरा व्यायाम व्हायचाय अजून! तो स्वप्नात झाला.’

मग मी बजावल्याप्रमाणे पटकन उठते. लग्गेच टाटे पाहते कपाट उघडून! योगासनं!

‘चला. थंडीत कुडकुडत बाहेर नाही पडायचय!’ मग भराभरा सगळं आवरून ट्रॅक पॅंट टी शर्ट वगैरे घालून तयार होते. आरशात पाहते तर काय? कसंबसं शरीर कोंबलेलं दिसतं! चवळीच्या शेंगेला लाजवेल इतक्या बारीक लेकीचा पॅंट शर्ट घातला वाटतं चुकून?

‘ओह मॅडम! शिरेल का अंगात तिचा पॅंट शर्ट! ही तुमचीच मागच्या महिन्यातली जॉकीतली खरेदी बरं! बाप रे केवढी जाडी वाढलीय!


काही नाही! आता नो दयामाया ऑनमधू! व्हा जरा बारीक!’ मन ओरडायलाच लागतं!

मग जरा वॉर्मअप होतो. त्यातच धापा टाकायला लागते.

‘शवासन करावं जरा! श्वास निवळू दे! मग होतील छान आसनं!’

शवासन मस्तच जमतं मला. खरंच! मास्टरी आहे माझी त्यात.

मग ते करताना हळूच एक विचार मनात शिरतो. शरीर हे क्षणभंगूरच आहे नाहीतरी. काय जाड काय बारीक, काय तरूण नि काय वृध्द!




जे जसं ठरलंय तसंच होणार. जेव्हा जे व्हायचं तेच होणार!

सध्या माझी जाडी वाढायचीच असेल तर वाढणार. नसेल वाढायची तर नाही वाढणार!

शरीर हाच जर एक भास आहे, तर मग भास जाडा असला काय किंवा बारीक असला काय? काय फरक पडतो?

‘मधू’ म्हणजे तरी कोण? हे नाव आईबापांनी दिलं म्हणून या शरीराला मधू म्हणायचं! तसं तर प्रत्येक जण त्या परमशक्तीचा अंश! मग त्या परमशक्तीचा अंश कुरूप , बेढब असेलच कसा?

बाहेरच्या आवरणाचा काय संबंध! वीज, गोलमटोल बल्बमधेपण असते, शेलाट्या ट्यूबमधेपण असते! म्हणून काय ती वीज जाड बारीक होते का?

असे आणि बरेच आध्यात्मिक विचार त्या शवासन समाधीत येतजात राहतात!

“अगं, योगामॅटवर घोरतेस काय?”

व्यायामाच्या बाबतीत अत्यंत शिस्त बाळगणाऱ्या नवऱ्याला ते घोर पाप वाटणं अगदीच स्वाभाविक असतं. तो ‘उठ उठ’म्हणून परत करवादतो आणि माझी परमानंदी लागलेली टाळी वाजते! दचकून घड्याळ पाहावं तर चक्कं साडेसात!

काही काय? आत्ता दोन मिनिटांपूर्वी शवासनात गेले होते ना मी?

श्या! पण मी अशी थोडीच हार मानणार!

“अरे हवाबदलामुळे श्वासाचा आवाज येतोय जरा! दोन मिनिटांपूर्वीच शवासन केलं!” मस्त लोणकढी थाप मारून मी डायरेक्ट ओट्याजवळ पळते.

आजच्या ब्रेकफास्टला खमंग भाजणीचं थालीपीठ आणि ताजं लोणी लिहीलंय म्हटलं टाटे मधे!

# आडनावे

आता याना आडनावं का म्हणतात असा प्रश्न मला नेहमी पडतो. कुटुंबनाव किंवा मुख्यनाव का नाही? त्यात आडून काय असतं बुवा? की ‘आडात नाही तर पोहोऱ्यात कुठून’ वगैरे म्हणींच्या आधारावर याला ‘आड’नाव म्हणतात की काय?

म्हणजे असं पाहा गद्रे आडातला अमित पोहरा, झरे आडातला सचिन किंवा गोगटे आडातला गिरीश?

मग आधी गद्रे आडातली पोहरी प्रिया, साठे आडात पडली,. असं की काय? बापरे कठीणच म्हणजे. (मी माझंही उदाहरण घेतलं असतं हो, पण दोन्ही आड लंबेलांब, कध्धी कुठल्या फॉर्मवर दिलेल्या जागेत मावत नाहीत. असो )तर या ‘आडनावा’च्या व्युत्पत्तीबद्दल इथेच थांबावं हे बरं.

बहुतेक ‘कर’ आड, गावांचे, तर ‘दार’ ‘नीस’ आड, कामाचे, असं असतं. पण त्यापेक्षाही निरनिराळे अनेक आड असतातच की.

मी ज्या गावात सातवी इयत्तेत असताना गेले तिथले आड फार चित्रविचित्र होते. म्हणजे मी सातवीत वर्गात गेल्यावर

हजेरीपटावरची नावं वाचून बाई जेव्हा हजेरी घ्यायला लागल्या तेव्हा माझ्या आडनावज्ञानात फारच भर पडली.

हरुगडे, गिंडे, मोटे, पितांबरे, तोतले, तोलमारे, जमदग्नी, किर्दत, असे बरेचसे पुर्वी न ऐकलेले आड ऐकायला मिळाले नि त्यातले पोहरे पोहरी पाहायलाही.

तत्पुर्वी मी कोकणनिवासी असल्याने मालवणकर, रांगणेकर, सामंत, टोपले, पोकळे, भातखंडे, लुकतुके, वझे, शिधये, झांट्ये वगैरे आड ऐकून पाहून होते.

काळे गोरे हे रंगीत आड ऐकले होते त्यात हिरवे, जांभळे व लाल या आडांची भर पडली.

नेहमीचे जोशी, कुलकर्णी, देशपांडे, पाटील, देशमुख हे आड होतेच, ते ही अनेक. मग या आडांना अजून काही आडून बिरुदं लावली गेली होती जेणेकरून चट्कन ओळख पटावी.

उदाहरणच द्यायचं तर पंचकन्या जोशी, जुळे जोशी, तिरसट जोशी, गोऱ्े देशपांडे, उंच देशपांडे, घुमे देशपांडे, मोठे पाटील, छोटे पाटील, मास्तर पाटील, ओरडे कुलकर्णी, जाडे कुलकर्णी.

आणि हे इतकं समंजसपणे घेतलं जायचं की माझा एक वर्गमित्र अनेक वर्षांनी फोनवर भेटला. मला काही केल्या आठवेना,

मग त्याने परवलीचा शब्द उच्चारला, “अगं मी जाड्या देशपांडे” आणि क्षणात ओळख पटली.

सांगायचा मुद्दा हा की हे ‘आड’नाव प्रकरण तसं महत्वाचच, ओळख पटवणारं, पण अलिकडे मंडळी याला फाटा देताना दिसतात.

परवा मुलीची मित्रमंडळी घरी आली. दोन आज्ज्या, नि दोन आजोबा घरी आहेत हे माहीत असल्याने जरा बिचकतच आली म्हणा. मग लेकीने सांगितलं हे माझे आजी आजोबा.

मग एकेक जण ओळख करून देऊ लागले. मी अंकित, मी पार्थ, मी स्वाती, ...... शेवटी माझ्या वडिलांचा कडेलोट झाला. अरे बापाचं नाव, आडनाव सांगायला लाजा वाटतात काय रे? सांगा की ते ही. पोरं सर्द!

मग अंकित रमेश पाटकर वगैरे ... करत ओळख परेड संपली नि पोरं हुश्श्य करून गच्चीवर निघून गेली.

तर असे हे आड नि त्यांची नावं. तुम्हाला आठवतात का काही वेगळे आड? तर करा मग ॲड.

# सवय

वय गेलं तरी जात नाही ती म्हणे सवय !

सवयी म्हटलं की पट्कन मनात वाईट सवयीच येतात का हो? हो ना? बहुधा असंच होतं. शिवाय, चांगली वाईटाची वर्गीकरणं तशी सापेक्षच ना. म्हणजे बघा हं, नवऱ्याची सकाळी लवकर उठण्याची चांगली (?) सवय बायकोला वैताग देते तर आईची घर सतत टापटीप ठेवण्याची सवय मुलांना कटकट वाटते.

आमची साधनावहिनी म्हणते "मला किनई सगळं जिथल्या तिथे ठेवण्याची सवय आहे बरं," वर म्हणाली "अंहं, गैरसमज नको गं करून घेऊस, जिथल्या तिथं म्हणजे जिथं घेतलं आहे तिथे तसंच ठेवायचं. सतत डोळ्यांच्या समोर. उगाच कशाला शोधाशोध." आवडलच मला हे तिचं. आयुष्य साधं सोप्पं करून टाकलय तिने स्वत:चं.

माझं तर नेहमीच असं होतं. महत्वाची कागदपत्र बरेच दिवस अशीच डोळ्यासमोर दिसत असतात पडलेली. नीट काढून ठेवायला हवीत, हरवायची कुठेतरी, असं मी घोकत असते मनाशी. मग तो सुदिन उगवतो. मोठ्या नीटनेटके पणाने मी ती कागदपत्र अगदी छान सुरक्षित ठिकाणी ठेऊन वगैरे देते. बरोब्बर पुढच्याच

आठवड्यात त्या कागदपत्रांची गरज पडते. आणि मग काही केल्या ती सापडत नाहीत. ती सुरक्षित जागा आठवत नाही. किंबहुना आपण ती सुरक्षित जागी काढून ठेवली हेच विसरायला होतं. मग सुरू होते घोर शोधाशोध. या शोधाशोधीत पुर्वी अशीच सुरक्षित ठिकाणी काढून ठेवलेली आणि नंतर न सापडलेली म्हणून हरवली गटात सामील झालेली दुसरीच कागदपत्र सापडतात आणि मग जो काही स्वर्गीय आनंद मिळतो त्याचं वर्णन शब्दात करणं कठीणच.

माझं अर्ध आयुष्य अशा शोधाशोधीत गेलय आणि असे अनेक स्वर्गीय आनंद मी उपभोगलेत, असं म्हटलं तर फारशी अतिशयोक्ती होऊ नये. शोधाशोध करण्याचीच सवयच जडलीय म्हणा ना.

काही काही गोष्टींची इतकी सवय असते की त्या यंत्रवत घडत असतात. उदा. सकाळी उठल्याबरोबर दंतमार्जनाची क्रिया इतकी अंगवळणी पडलेली असते की ती अगदी यंत्रवत केली जाते.

जेवणाच्या सवयी पण गम्मतशीर असतात एकेकाच्या. यात प्रांताप्रमाणे फरक तर पडतोच पण वैयक्तिक सवयीही मजेमजेशीर असतात.

एखादा तोंडभर घास घेतो, मग तोंड मिटून सावकाश चाऊन तो घास संपवतो तर एखादी फक्त बोटांची टोकं वापरून अन्न चिवडल्यासारखं जेवते. कोणी एखादा ताटातला प्रत्येक पदार्थ प्रत्येक घासाला लावून जेवतो तर कोणी एक एक घासाला एक एक तोंडीलावणं घेतो.

कोणाला पाणी जेवणाआधी लागतं कोणाला नंतर.

अभ्यासाच्या सवयी ही अशाच भन्नाट. जे लोक काही वर्ष का होईना वसतिगृहात राहिलेत त्यांच्याकडे साठाच असेल अशा किश्शांचा.

आमच्या कॉलेजमधे एक मुलगा परीक्षा सुरू झाली की आंघोळ बंद करायचा ती १५ मिनीटं अधिक मिळावीत अभ्यासाला म्हणून. परीक्षा महिना दीड महिना चालायच्या हो तेव्हा. अर्थातच त्याच्या रुममेटने हे आम्हाला सांगितल्यावर पोरी हादरल्याच सगळ्या. तसा दिसायला हीरो वगैरे होता हो बऱ्यापैकी. पुढे नोकऱ्या वगैरे लागल्यावर माझ्या दुसऱ्या एका मैत्रिणीला त्याचं स्थळ सांगून आलं, माझ्या कॉलेजचा म्हणून माझ्याकडे स्थळाची चौकशी केली, आता नको तेव्हा हा संदर्भ मला का आठवावा? झालं, ते लग्न काही ठरलं नाही. नको तिथे नको ते बोलायची माझी सवय नेमकी मध्ये आली.

म्हटलं तर सवयीने लागलेल्या सवयी, पण आयुष्याचा एक अविभाज्य भाग असतात हे खरंच.

"अतिशय यशस्वी परिणामकारक माणसांच्या सात मुलभूत सवयी " वगैरे स्वमदतीची पुस्तकही प्रकाशित होतात. मी सवयीने ती विकत घेऊन कपाटात ठेवते झालं!

# ऋणानुबंध

आपल्याला भेटणारं प्रत्येक जण आपल्याशी काही ऋणानुबंध असतो म्हणूनच भेटतं असं मध्यंतरी प्रतिमा ताईंनी लिहीलं आणि मी सहमत झालेही होते त्यांच्या लेखनाशी.

पण ती जनरल सहमती होती. म्हणजे ‘हो बुवा , असेल’ असं काहीसं! की आपल्या आसपास कॉलनीत राहणारी , बिल्डींग मधे राहणारी मंडळी , इतक्या निकट राहूनही बऱ्याचदा पूर्णपणे अनोळखीच असतात. म्हणजे त्यांचा आपल्याशी याआधी कोणताही ऋणानुबंध निर्माण झाला नसणार.

किंवा आमच्या ‘माझा मराठीचा बोल’ या समूहामध्ये सर्व देशांतून, खंडातून वसणारे लोकही, प्रत्यक्ष न भेटताही, जुनी ओळख असल्यासारखे आपलेसे वाटतात, त्याअर्थी त्यांच्याशी नक्कीच काही ऋणानुबंध असणार वगैरे.

पण परवा माझी नवी दंतशल्यविशारद डॉ. ऋतुजा हिच्याशी गाठ पडली आणि हे १००% सत्य विधान आहे याची खात्री पटली.

पोरगी मोठी गोड स्वभावाची. बडबडी. आत्मविश्वासाने भरपूर

.

डेंटिस्ट ची आरामखुर्ची (पेशंटला बसवतात ती) नामक यमाच्या रेड्यावर मला खेचून बसवण्यापुर्वी (आणि बसवेपर्यंतच ) आमची अगदी गट्टीच जमली.

सिनेमा, नाटक, संगीत, खाद्यपदार्थ, सायकलींग(तिचं), जिम(अर्थातच तिचं हो) , हॉटेलिंग, (माझं) वाढतं वजन (हो हो माझंच ) एक ना अनेक हजारो विषयांवर आमच्या गप्पा अगदी जुन्या मैत्रिणींसारख्या रंगल्या! वयातला फरक ही जाणवला नाही. हो हो, ती तरूण, मी...... , जाऊ दे.

तर त्या खुर्चीत मला बसवेपर्यंतचा कालावधी लक्षात घेता, तिचे नि माझे जुने ऋणानुबंध अत्यंत प्रेमाचे, आपुलकीचे, ममत्वाचे, मैत्रीचेच असणार या विषयी माझ्या मनी कोणतीच शंका

उरली नव्हती. नाहीतर पहिल्याच भेटीत इतकं कसं कोणी आवडू शकेल?

तर अशा प्रेमळ वातावरणात, प्रेमळपणे तिनं मला त्या रेड्यावर चढवलं. ‘आता नं मी खुर्ची थोडी वर आणि थोडी मागे करणार आहे’ अशी प्रेमळ पूर्वसुचना देत तिने खुर्चीची बटनं दाबत ती फटाफट पुढेमागे, खालीवर केली. मला क्षणभर आपण रोलर कोस्टर मधे बसलोय असा भास झाला.

मग हळू हळू तिने तिची निरनिराळी आयुधं परजायला सुरवात केली. तशी मी धीराची बाई. मी तरी तसं समजते. म्हणजे, असं पहा, इंजेक्शन घेताना मी मान पूर्ण बाजूला वळवून , डोळे गच्च मिटून , ‘स्स्स्स’ वगैरे कसलेही आवाज काढत नाही. मी सरळ सिरींजच्या डोळ्याला डोळा भिडवून , ‘हं, टोच काय टोचायचं ते’ असं म्हणते( मनातल्या मनात हो) .

तर तशी तिनं आयुधं परजल्यावरही मी बरीच होते. मग ती म्हणाली ‘आ करा’. मी नकळत बेसावध पणे मोठ्ठा ‘आssss’

केला. तर त्या xxx ने C आकाराची एक चकती माझ्या दोन्ही गालफडात खस्सकन घुसवली.

आता माझी दोन्ही गालफडं लहानपणी आम्ही एकमेकांना घाबरवण्यासाठी दोन्ही हाताचे अंगठे गालफडात घालून , बाकी बोटं डोक्यामागे एकमेकात गुंतवून जीभा बाहेर काढून राक्षस राक्षस खेळायचो तशी पण दसपटीने अधिक ताणली गेली.

इथे फक्त जीभ बाहेर काढायला परवानगी नव्हती आणि गालफडं त्या खेळापेक्षा दसपट ताणली गेली होती.

वर तिची आयुधं ती माझ्या तोंडात खुपसण्याच्या इराद्याने परजू लागली. तिच्या तोंडावर मास्क होता पण डोळ्यात उमटलेली ( खुनशी ? ) चमक मला स्पष्ट दिसली आणि त्या वातानुकुलित खोलीत मला दरदरून घाम फुटला.

हे काहीतरी वेगळंच घडत होतं. मगाशी माझं गोड गोड बोलून मन जिंकून, मला गाफिल ठेऊन, आता ती आपले खरे रुप दाखवणार होती.

आता पुढे काय घडणार या भितीने माझी बोबडी वळू पहात होती, पण त्या गालफडांना आधीच ताणताणून तिने ती ही सोय ठेवली नव्हती. मी हाताने थांबण्याच्या खुणा करू लागले तशी म्हणाली, “काही नाही, मी ना फक्त चेक करतेय, कुठे कॅव्हिटीज आहेत, कुठे फिलिंग ची गरज आहे का वगैरे!” हातात गर्र्र्रर्र फिरणारी लांब अणकुचीदार सुई घेऊन ही फक्त चेक????? करणार होती?

माझी पाचावर धारण बसली. पहिल्या मोक्याला उठून पळ काढायचा आणि परत वळूनही पहायचं नाही या दिशेला असं ठरवून मी त्या मोक्याची वाट पहात बसले. पण हाय रे दैवा!! काय हिचं मागच्या जन्मी मी घोडं मारलं होतं देवच जाणे.

तिने माझा एक न् एक दात कोरायलाच घेतला. त्याबरोबर खास मतप्रदर्शन सुरू होतं. “हे असलं फिलिंग कोणी केलय? पार हिरडीपर्यंत घुसवलय” असं म्हणत क्षणात तिने माझ्या पुढच्या दोन दातांमधल्या फिलिंगला सुरूंग लावला. कळ सणकन डोक्यात गेली.

माझ्या सहा महिन्याच्या सुपुत्राने (जो आज ३० वर्षांचा आहे ) पहाटे, त्याच्या बरोबर खेळत नाही , डुलक्या काढते , या रागास्तव जवळ खेळायला दिलेला डबा फेकून मारून माझे पुढचे दोन दात अर्धे पाडले होते.

त्या वेळी देवदुताप्रमाणे माझ्या डेंटिस्ट कझीनने त्याला पॅचवर्क करून, फिलिंग करून माझे सुंदर स्मितहास्य (?) पुर्ववत करून दिलेले आजतागायत जसे च्या तसे होते, ते आज या बयेने संपूर्ण पणे उद्ध्वस्त करून टाकले.

आता माझ्या पुढच्या दोन दातात प्रचंड दरी निर्माण झाली. मला अजून त्याची नीटशी कल्पना आलीच नव्हती.

मग एक एक करत तिने बरेच दात कोरले, कधी क्लिनिंगच्या नावाखाली, कधी कॅव्हिटीजच्या!! दर ड्रिलच्या स्पर्शाबरोबर कळ मस्तकात जात होती, ती वेगळीच.

शेवटी तिने त्या दिवशीचे कार्य थांबवले. मला म्हणाली, “ आज मी सगळं चुकीचं काढून टाकलय. आता दोन दिवसांनंतर या , मग पुढचं काम करू. मी मनात म्हटलं, “वेडी की काय? फासावर

चढणाऱ्या कैद्याला , आता जा, दोन दिवसांनी ये, मग फासावर चढवीन असं जेलर म्हणाला तर तो परत येतो का कधी!!”

तिला माझ्या मनातलं बरोब्बर कळलं असावं. तिने माझ्या हातात आरसा दिला. ती C चकती परत खस्कन ओढून बाहेर काढली. गालफडं पुर्ववत व्हायचं विसरूनच गेली होती एव्हाना. त्यांना जरा थापटून जागेवर आणलं. “उगी उगी, परत नाही हो या कैदाशिणीच्या ताब्यात देणार तुम्हाला “ अशी मनोमन समजूतही काढली त्यांची!!

मग तिने दिलेला आरसा समोर धरला. पोटात जबरदस्त खड्डा पडला.

समोर दिसत असलेली, दोन दात तुटकी, समोरच्या दातात एका दाताएवढी फट पडलेली जख्ख म्हातारी पाहून मीच दचकले. मग ती आपणच आहोत ही भयंकर जाणीव होऊन भोवळच यायची बाकी राहिली.

ती जुने ऋणानुबंध वाली, अत्यंत छद्मी हसत, “मग येताय ना पुढच्या शनिवारी? तुमची स्माईल किलींगली ब्युटीफुल करून टाकू” म्हणाली. मला फक्त ‘किलिंग’ हा शब्द खरा वाटला. बाकी सब झूट , मोहमाया है.

पण न येऊन सांगते कोणाला? माझी पापं फारच मोठी असावित. पण ते नंतर सांगते. कोणाची तरी पावलं वाजली जिन्यात. मी आत जाऊन बसते. असं तोंड लपवून जगायची सवय नाही हो मला!!

तर काय सांगत होते? नंतरचे कित्येक शनिवार बुधवार मी ऋतुजाकडे लावले.

पहिल्या शनिवारी तिने मी वाघोबासारखी कधीच दंतमार्जन वगैरे करत नसल्याची जाणीव मला करून द्यायला सुरवात केली. हा पाहिलात काळा स्पॉट? , कीड आहे. काढून टाकून फिलिंग करावं लागेल. आणि इथे पहा कसं डिस्कलरेशन झालय. हा आणखी एक स्पॉट! हं! असं म्हणत तिने एक भला मोठा सुस्कारा सोडला.

आता ती, हे बघा , ते बघा करत माझ्या हायजीन प्रतिष्ठेची ऐशी की तैशी करत होती, आणि माझ्या तोंडात तो C आकाराचा आकडा. तिच्या हातात गर्र्र्र फिरणारं सुदर्शन चक्र (अदृश्य अर्थातच ) म्हणजे त्याची भयावह सुई दिसत होतीच ना. आता मी कोणत्या तोंडाने माझा विरोध दर्शवणार होते? मी बापडी त्या गर्र्र्र

सुईच्या धास्तीने गरीबातल्या गरीब गोगलगायीसारखी गुमान बसून होते. तोंडाचा फक्त भलामोठा आ वासलेला.

मग तिने सुखनैव तिच्या मनाला येईल तसं ऋणानुबंध मोकळे करायला सुरवात केली. एकदा या दाताला पोखर, एकदा त्या दाताला, सणकन एकदा ती नस, एकदा ही नस, मधेच मी फारच न राहवून हातापायांची हालचाल करत असहायता दर्शवली तर ‘झालं हं, थोडंच राहिलय’ असं धादांत खोट बोलत , ऋणानुबंध मोकळे करण्याचं कार्य सुरूच ठेवलं. मास्कच्या मागे ती या सर्वाचा मनापासून आनंद लुटत खुदखुदतेय हे तिच्या चमकिल्या डोळ्यातून मला स्पष्ट दिसत होतं.

काही दिवस असंच ठेवू, असं म्हणत तिने स्वत:चं समाधान होईपर्यंत पोखरापोखरी केल्यावर आणि यमाच्या रेड्यावरची माझी फोडणीत टाकलेल्या मोहोरींच्या दाण्यांसारखी होणारी तडतड आत्यंतिक सुखाने एन्जॉय केल्यावर त्या दिवसापुरती माझी पॅरोलवर सुटका केली.

आता तुटक्या दातांनी मी तरी कुठे जाणार होते? पण काही ठिकाणं, तुम्ही वैकुंठवासी होईपर्यंत तुम्हाला नाकारता येत नाहीत

ती म्हणजे बॅंक आणि किराणा मालाचं दुकान. मग तिच्याकडून ही दोन ठिकाणं करूनच घरी जावं असं ठरवून मी प्रथम बॅंकेत शिरले.

नेहमीच्या माझ्या प्रेमळ कॅशिअर बाईने, “एवढी मोठी अमाऊंट काढायची तर मॅडमना स्वत:ला यावं लागेल,” असं मलाच, प्रत्यक्ष मलाच, तोंडावर सांगितलं. यापुढे उगाच सगळ्यांना तोंडभर हसून भेटायचं नाही हा पहिला धडा मला मिळाला. मी तिला माझी ओळख न देणंच पसंत केलं. गपगुमान, कार्डवर एटीम मशीन मधे जेवढे पैसे अव्हायलेबल होते ते काढून बनियाकडे गेले. तिथे मात्र बॅंकेतली कॅशिअर फारच दयाळू होती असं म्हणायची वेळ आली.

त्याला लिस्ट सांगायला लागल्यावर , “आजी, तुमी कशेला आले? एवडं सामान कशे नेनार? मॅडमला पाठवायची ना?

असं म्हणून माझा उरला सुरला आत्मविश्वास वजनाचा काटा ज्या सहजतेने मारतो त्याच सहजतेने मारला.

गेली काही वर्ष लेक ऑनलाईन शॉपिंगचं महत्व पटवण्याचा असफल प्रयत्न करत होती ते या माणसानं क्षणात करून दाखवलं!!

बुधवारपर्यंतचे दिवस अज्ञातवासात काढून मी तिच्याकडे गेले. आज काही करून ती गर्रर सुई तोंडात जाऊ द्यायची नाही,

आणि कसंही करून तोड मोड जोडून घ्यायची असा चंगच बांधून मी पोचले. गेल्या गेल्याच तिने तिचे बिनाका (आम्हाला बुवा हाच ब्रॅंड आठवतो ) स्माईल अख्खी बत्तीशी दाखवत दिले. मी ही मग तिचा मूड बघून तिला माझा मानस बोलून दाखवला.

तिनेही "हो हो, मॅम, आज परफेक्ट करून टाकू" असं बत्तीशीभर आश्वासन दिलं आणि अनुभवातून काहीच न शिकलेली मी निर्धास्तपणे रेड्यावर आपणहून स्वार झाले. एक रोलर कोस्टर राईड मला देऊन तिने मी पुर्णपणे तिच्या कह्यात कशी जाईन याची पूर्ण काळजी घेत रेड्याला आणि त्यावरच्या मला तिच्या अधिपत्याखाली आणले.

"आता नं आपण, तुमचे दात जरा आकारात आणुया , आणि मग मी परफेक्ट शेड मॅच करून तुम्हाला कॉम्पोझिट करून देते." असं म्हणत मला क्षणाचीही उसंत न देता माझा शर्मिला टॅगोर जबडा , झहीदा हुसेन च्या (प्रेम पुजारी मधील खलनायिका, गॅम्बलर मधील नायिका देव आनंद बरोबरची, चुडी नही मेरा दिल है म्हणणारी ) जबड्याइतका ताणून त्यात तिचा लाडका C घुसवला.

आता नुसता तोंडाचा आ वासलेला. बोलणं संपलच. मग तिने अधिक खोलवर कोरीव काम सुरू केलं आणि पावसाळयात शतपादांचा डोंगर जरा धक्का लागल्यावर जसा सर्व बाजूंनी वळवळायला लागतो तसं माझं अंग दाही कोनात वळवळू लागलं. डोकं मात्र तिने आपल्या पोलादी पकडीत घट्ट आवळून घेतलं होतं. पुढची १५ मिनीटं माझ्या आयुष्यातली प्रचंड उलथापालथीची, (शारिरीकही आणि मानसिकही) , वेदना, नरकयातना, मृत्यू, याविषयी माझ्या जाणीवा प्रचंड रुंदावणारी अशी होती. डोक्यात एकही नस अशी नव्हती जी या १५ मिनीटात सळसळली नाही.

त्याक्षणी यातून सुटकेच्या बदलेत ऋतुजाने माझी अख्खी जन्मभराची मिळकत, स्थावर , जंगम, दोन्ही लिहून मागितली असती तर मी क्षणभराची उसंत न लावता ती लिहून दिली असती, स्वखर्चाने स्टॅंप पेपर आणून!!

सरते शेवटी तिच्याच पाठीला रग लागली असावी तिने तिचे हे कोरीवकाम, नाही, खोदकाम थांबवले.

काही क्षण इतके शांततेत गेले की ती ही घाबरली. बयेचं रेड्यावरच काही बरं वाईट तर...

“मॅम.. मॅम... , “

“अं...हं, “ मी काहिशी संभ्रमात होते की भुतलावरच आहोत की? एवढी अफाट शांतता म्हणजे....

पण छे, चांगली याची देही, याची तुटक्या दाती, रेड्यावर आरूढ , मी अजूनही C ला तोंडी धरून विराजमान होते.

“त्रास नाही ना झाला फार?”

अख्ख्या कलीयुगाच्या सुरवातीपासून आत्तापर्यंतचं सर्वोच्च विनोदी, खालचं विधान (अंडरस्टेटमेंट हो ) तिने उच्चारलं होतं. वर C तसाच माझ्या तोंडात अजून .... असोच!!

मग मात्र तिने “आता मस्त करून देते तुमची स्माईल. हे तात्पुरतं आहे, परमनंट करेपर्यंत,” असंही पुढील छळाचं सुतोवाच करून टाकलं.

मग तिने बऱ्याच कसल्या कसल्या शेड मॅच केल्या. माझ्या दातांवर कसला तरी हवेचा स्प्रे मारला, आणि मी केवळ वेदनेच्या प्रचंड शक्तीने रेड्यावरून दोन फुट वर उंच उसळी मारली.

सक्शन साठी माझ्या तोंडात एक नळी, मधून मधून खुपसणारं, राणी नामक पाप्याचं पितर या धक्क्यानं पार कोलांटी खाऊन जमिनीवर पडलं. ( या कॅरॅक्टर विषयी यात लिहीण्याचं मुद्दाम टाळलय, ती स्वतंत्र लेखाचा विषय आहे )

ऋणानुबंध ही हादरलाच या प्रतिक्रियेने. मग भराभर तिने भिंती सारवतात तसं लिंपण उरकलं.

मला जरा जरा वरचे ओठ मारुतीसारखे वाटू लागले होते, पण मी काही बोलले नाही. माझा त्यावेळी एकमेव उद्देश त्या ठिकाणावरून पळ काढण्याचा होता. जमलं तर दातांसह नाहीतर दातांशिवायही!!

तिने यावेळेस तोंडातला C अलगद बाहेर काढला. म्हणजे भवानीला हळूवार काम पण करता येतं की! माझाच का मग असा छळ म्हणे? पण काही म्हणण्याची शक्तीच उरली नव्हती.

तिने पुढे केलेला आरसा पाहण्याचीही तसदी मी घेतली नाही.

“हे तात्पुरतं आहे, फक्त मऊ अन्नच खा.” मी दारातून बाहेर पडता पडता तिने हलकेच सांगितलं.

‘बये हा नाजूकपणा कामात दाखव की.’ मी मनातल्या मनात दातओठ खात म्हटलं. प्रत्यक्षात दात ओठ खाणंही शक्य नव्हतं आणि बोलणंही!!

बाहेर पडले. त्यातल्या त्यात आनंदाची गोष्ट अशी की दात तुटके दिसणार नव्हते.

या रविवारी भावी व्याही जेवायला येणार होते आणि रात्री समस्त माहेरवासियांसाठी माझ्या मातेने अधिक वाणाचा समारंभ ठरवला होता.

सगळ्या चुलत मावस मामे आते भावंडांनी ‘मधुताईची’ जी यथेच्च टर उडवली असती त्यातून तरी सुटका झाली या आनंदात मी तोंडाला स्कार्फ नामक फडकं न बांधताच स्कुटर स्टार्ट करून निघाले.

रस्त्यापेक्षा सिग्नल फार अशा आमच्या कोथरुड मधे लग्गेच सिग्नल लागला. स्कुटरच्या आरशात नकळत नजर गेली आणि मी इतकी सटपटले की सिग्नलवरच स्कुटर वरून आडवं पडायचं भय वाटलं.

संपूर्ण पुढचे दात पिवळे जर्द, साधारण पुर्वीपेक्षा अर्धा इंच मोठे आणि पाव इंच फुगीर असे चेटकिणीच्या दातांसारखे दिसत होते. परत जाण्याची हिम्मत माझ्यात नव्हती.

संपूर्ण आयुष्यात एवढी हतबल मी कधीच झाले नव्हते. पडलेल्या खांद्यांनी आणि झाकलेल्या तोंडाने मी कशीबशी घरी पोचले.

रविवारी व्याह्यांनी आणि विहिणबाईंनी आपल्या पोरीची सासू अगदीच घुम्मी आहे , बाकी सगळी मंडळी मात्र छान मनमोकळी


बोलकी आहेत, असा समज करून घेतला. तसं गोंडस शब्दात बोलूनही दाखवलं.

त्यावर सासूबाईंना फुटणाऱ्या आनंदाच्या उकळया पाहून मी मात्र आतून कशी खदखदत होते हे माझं मलाच माहित.

पण मुलीची सासू चेटकिणीसारखी दिसते पेक्षा घुम्मी आहे हे परवडणारं होतं.

मग ती भयानक संध्याकाळ उगवली. सर्व माहेरची मंडळी जमा झाली. हास्य विनोदांना उत आला. मी मात्र मंद स्मितहास्य कायमचं धारण करून वावरण्याचा पवित्रा कायम राखला होता.

तितक्यात तीन वर्षाचा भाचा लाघवीपणे जवळ येऊन कडेवर घे म्हणाला. त्याच्या लोभस बडबडीत मी सगळं विसरून त्याच्याशी गप्पा मारू लागले तेव्हा "ए अवधूत, मधुमावशीचे दात बघ , गोष्टीतल्या चेटकिणीसारखे पुढे आलेत पिवळे पिवळे." हे असं इतक्या जोरात ओरडून म्हणाला की टाचणी पडली तरी आवाज यावा असा सन्नाटा काही क्षण तिथे पसरला, त्या पोट्ट्याची माय हसू दाबत, लटकं रागावत त्याला घेऊन दूर गेली. सगळे जवळ येऊन हसू दाबत दूर जाऊ लागले. अख्खी धरणी दुभंगून आपल्याला पोटात घेईल तर बरे असं वाटून राह्यलं त्याक्षणी!!


ए, अवधूत, मधुमावशी
बघ कशी
चेटकिणीसारखी
दिसतेय

तेवढ्यात मोठा भाचा अगदी समोर उभा राहून “मधुमावशी, से चीज” असं म्हणाला आणि नकळत मी , यडपट फोटोॲडिक्ट , तोंडभरून चेटकिण स्पेशल स्माईल दिली तोंडभर!!!

मग कचकन दचकून ओठ चावला तेव्हा दोन, एका आड एक दातांवरचं ते लिंपण सुटून पडलं. आता दोन अख्खे पिवळे जर्द दात दोन तुटके पांढरे दात असं प्रचंड भयावह चित्र दिसू लागलं. पोट्ट्यांनी त्याचाही फोटो काढला!

नुसती ‘ऋ’ च ऋणानुबंधात बांधली नसावी. तिच्या लॅबवाल्याचंही काही जुनं देणं असावं माझं.

मध्यंतरीच्या काळात त्याने तीन चुकीचे कास्टस बनवून दिले. मग परत परत त्या ॲडजस्टमेंटस , त्याबरोबर होणाऱ्या हिरड्यांना जखमा. वैताग आला नुसता.

काही अपॉईंटमेंटसना मी गेलेच नाही मग. झाले तेवढे तमाशे पुरे असं वाटलं. म्हटलं राहू देत तुटके तर तुटके. दात माझे, मला हवे तसे ठेवेन. पुढचे दोन तुटके दात, मधुचं नवं फॅशन स्टेटमेंट!! बिग डील!!

पण कसलं काय नि कसलं काय! एक नवंच झंझट झालं. सकाळी सकाळी कसलं तरी पार्सल आलं.

आता हे पार्सल येणं हेच एक मोठं झंझट आहे. पोरं तर पोरं , बाप रे बाप!! उचलला फोन, कर ऑर्डर, उचलला फोन .... संपतच नाही. बरं केलं तर केलं. आलं की दुसऱ्या क्षणी परत करायचं. छे, फोटोत किती वेगळं दिसत होतं???

मग? फोटोत सगळंच वेगळं दिसतं, माणसं सुद्धा!!

हे पार्सल घेणं आणि परत करणं यासाठी एक नोकर ठेवावा, असा प्रस्ताव सासूबाईंनी मांडला होता मध्यंतरी .

असो. तर पार्सल आलं.

बेल वाजली की दाराकडे पळणं हे मी गेली ३० वर्ष 'हम पांच' च्या स्विटीच्या उत्साहाने गाणं न गाता करत आलेय. तर अर्थातच मी दाराकडे पळाले. दारात पार्सल घेऊन तो मुलगा उभा. पार्सल घेतलं. "सही कुठे करू ?" विचारल्याबरोबर त्याने चमकून माझ्याकडे पाहिलं. म्हटलं "असं बघत काय बसलास? लवकर दे टॅब, फोडणी जळतेय माझी. कुठे करू सही??" पुन्हा दचकून त्याने वर पाहिलं. आता मात्र माझ्या चेहऱ्यावर राग स्पष्ट दिसला असावा . मग त्याने पटकन टॅब पुढे केला.

थोड्या वेळाने कुरीयर वाला आला. परत एनव्हलप घेऊन म्हटलं "सही कुठे करू?" चमकून नजर वर!! अरे देवा...

“सही....??” आणि मग लक्षात आलं. स... म्हटलं की तुटक्या दातातून शिट्टी वाजतेय.....

हे भगवान!! आता?

स श ष नी सुरू होणारे शब्द बोलण्यातून काढून टाकणे अत्यंत गरजेचे झाले होते. आता जिचं आडनाव शिरगांवकर ती कसंहो टाळणार हे? मुलांची नावं ‘स’ वरून ठेवल्याचा पस्तावा प्रथमच झाला. घराचं नावही ‘स’ वरूनच!!

काही ही बोललं की शिट्ट्या!! वैताग नुसता. इंटरनेट प्रोव्हायडर ला गेले बरेच दिवस फोन करत होते. नेमका आज उगवला. फॉर्म भरायला लागला. नाव ...शिट्टी ... शिरगावकर, पत्ता. शिट्टी..साधना... वाजताहेत नुसत्या शिट्ट्या.

नवरा उगाचच शिट्टीवर गाणी वाजवायला लागला. पोरगीही त्याला सामिल, खुदूखुदू हसायला. !! सासूबाईंचा पदर सतत तोंडावर.




तुटक्या दातांचा बाऊ न करता बाहेर बिनधास्त पडण्याचा विचार कच खाऊ लागला. कारण आता वेगळीच काळजी लागली. म्हणजे आता बघा, रिक्षावाल्याला सांगायचं असेल “संभाजी पार्कला घे”, तर मी कसं म्हणणार शिट्टी...संभाजी पार्क...... मग तो ही म्हणेल कदाचित शिट्टी.... बसा की , पुण्यातला

रिक्षावाला असंही म्हणायला कमी नाही करायचा , काय बाई, दिसायला सभ्य दिसताय आणि....

परमेश्वरा...... ऋणानुबंधाच्या ताब्यात परत.....

इकडे आड तिकडे विहिर.... इकडे गर्रर्रर सुई तिकडे शिट्टी... नवनव्या म्हणी तयार होताहेत मनात हेच कमी म्हणून की काय ऋणानुबंध काही दिवसांसाठी परगावी गेल्याचं कळलं. आता शिट्टीला पर्याय नव्हता.

नेमकं ओळखीचे एक काका हॉस्पिटल मधे ॲडमिट झाल्याचं कळलं.

आमच्या घरी एक अलिखित नियम आहे. कोणाचंही लग्न असो, मुंज असो, सत्तरी, वाढदिवस असो, तेरावा, पंधरावा, वर्षश्राद्ध, कोणी आजारी आहे , काहीही असो, मग ते माहेरच्या कुटुंबात असो, की सासरच्या, या सर्व ठिकाणी जाण्याचे संपूर्ण हक्क घरातल्या सर्वांनी मिळून एकमताने मला बहाल केले आहेत. मी कधीही न मागता.

वर "तुला काय गं, तुझं काम रात्री पण बसून करता येतं, तुला कुठे वेळेचं बंधन आहे ?" असंही वर असतं.

तर त्या ओळखीच्या काकांना भेटण्याचा हक्क फक्त मलाच बहाल असल्याने जाणं भागच होतं. मग नेहमीप्रमाणे फळं, थोडं

सूप, नारळ पाणी वगैरे घेऊन निघाले. ‘दीनानाथ’ रिक्षावाल्याला एवढंच पुरलं. मी मनातल्या मनात हुश्श्य केलं.

वर काकांच्या खोलीत गेले. आता आजारी माणसाला विचारण्याचा पहिला प्रश्न विचारला, “कसे आहात?” जोरदार शिट्टी..... काका आणि काकांचा जावई , चमकून पाहू लागले. मी त्या गावचीच नसल्यासारखी भराभर पिशवीतून आणलेल्या गोष्टी टेबलवर ठेवण्याचा बहाणा केला. मग विचारपूर्वक मनात ठरवून मगच तोंडाने बोलायचं असं ठरवून टाकलं.

काकांना म्हटलं “नारळपाणी देऊ?”

काका म्हणाले नको. दुपारी घेईन. मग चॉईस होते सफरचंद किंवा सूप!! आपण पेरू किंवा आंबा का नाही आणला फळात ?? आजाऱ्याला पेरू? आंबा? जाऊच दे.

मग म्हटलं नंतर घ्या. तर तेच म्हणाले “त्या थर्मास मधे काय आहे?” मी पटकन बोलून गेले “सूप” अर्थातच भल्या मोठ्या शिट्टी बरोबर

काका आमचे महानच!! “अगो , तुच का शिट्ट्या मारते आहेस? मगापासून विचार करतोय शिट्ट्या कुठून वाजताहेत?” आता काय बोलणार यावर?म्हटलं, येते नंतर उद्या वगैरे निवांत!!पडले बाहेर!! आता हे काका बरे होऊन बाहेर पडेपर्यंत जो

जो भेटायला येईल त्या सर्वांना माझ्या शिट्ट्यांची खबरबात पोहोचवतील , बरा टाईमपास करतील!!!!

ऋणानुबंध कधी एकदा परगावाहून परत येतोय असं झालय!! परगावाहून परतणाऱ्या नवऱ्याची सुद्धा इतक्या आतुरतेने वाट नव्हती पाहिली कधी!!

ऋणानुबंध गावाहून परत आल्याबरोबर गेले. म्हटलं काहीही कर आणि शिट्ट्या बंद कर. त्या शिट्ट्यांनी माझी शिट्टी वाजवलीय.

ती मस्त बेरकी हसली. कशी आलीस गपचूप. फोन करूनही येत नव्हतीस काय? हे सगळं त्या हास्यात स्पष्ट वाचता येत होतं. मग तिने यावेळेस जरा कमी पिवळे खोटे खोटे दात बसवून दिले. मी हुश्श्य केलं. निदान आता दुसऱ्या दिवशी च्या स्पेशल मीट मधे खुल्या तोंडाने दिलखुलास हसता बोलता( आणि मुख्य म्हणजे खाता ) येणार होतं.

स्वरुपचे स्वादिष्ट पोहे, बटाटेवडे, साबुदाणा खिचडी, चमचमीत भजी, इडली, वडा सांबार, डोसा, .......... आहाहा आठवणीनेच मन, कसं उचंबळून आलं. वर आणि आंबा हिम्ममलई , मेंदूने जिव्हादातांचा ताबा घेतला. नुसत्या

आठवणीनेच मन इतकं तल्लीन झालं की भान न राहवून मी कचकन ओठ चावला व त्यासरशी नाजूकशी दंतपाकळी ओठांवरून घरंगळली. परत एक तुटका दात अनावृत्त झाला. मला रडूच फुटलं.

रडत रडत ऋला फोन केला. माझी केविलवाणी अवस्था वर्णन करकरून सांगितली. कसे सगळे या तुटक्या दाताचा फोटो घ्यायला टपलेत हे ही सांगितलं. मग ती म्हणाली ये परत संध्याकाळी. गेले, न जाऊन सांगते कुणाला. गेले.

तिने सर्व दात चेक केले . सुदैवाने(?) बाकीचे दात ठीक होते. मग तिने फक्त त्या तुटक्या दाताला फ्रॉक घालायचं ठरवलं. यावेळेस तिने भरपूर डिंक (?) थापला. मग निळ्या प्रकाशाच्या दिव्याने क्युअरींग नावाचा प्रकार करू लागली तेवढ्यात वीज गेली. आज पुरी कायनातच माझ्या विरोधात आणि ऋणानुबंधाच्या बाजूने खडी होती. आता काय होणार? मला उघड्या डोळ्यांनी भयस्वप्न दिसू लागलं , “मी स्वरुप मधे तुटक्या दातासह प्रवेश करतेय. सगळे नजर रोखून माझ्याकडे पहात आहेत. शिट्ट्यांचा कानोसा घेत आहेत. तुटक्या दाताची एक झलक मिळाली तरी तो फोटोत टिपण्यास उत्सुकतेने मोबाईल हातातच धरून बसले आहेत .... बाप रे! मी जोरजोरात मान हलवली. ‘ऋ’ लाही याचं गांभीर्य

कळलं असावं . तिने लगेच जुगाड करायचा ठरवला. राणी नामक पाप्याचं पितर उर्फ तिच्या असिस्टंटला तिने ती ब्लु फिल्म काढ गं असं फर्मान सोडलं.

नाही नाही , थांबा!! अजिबात कल्पनेचे दोर सोडू नका. ती ब्लु फिल्म नव्हे. तुमचा काही गैरसमज झाला काय?

ही ब्लु फिल्म म्हणजे साधा प्लास्टीकचा निळा कागद!!!! निळया प्रकाशाच्या निर्मितीसाठी. उगाच माझ्याकडे ऋ चा नंबर, पत्ता वगैरे मागू नका!!

तर तिने निळी प्लास्टीकची फित काढ गंअसं फर्मान सोडलं . व मोबाईलच्या टॉर्चच्या उजेडात ती निळी फित धरून क्युअरिंग करायला घेतलं. काही वेळाने वीज आली. मग पुढचं काम कसंबसं झालं. मग मी दोन तीन दिवस आजाऱ्याचा मऊ भात खाल्ला. आता मला कसलीच रिस्क घ्यायची नव्हती. दुसरे दिवशी मीटला गेले. जपून थोड थोडं खात मीट पार पाडली.

आज ॲसिडीटीचा त्रास होतोय, वाढदिवशी अती केक भरवून घेतला, तो बाधला, वगैरे नानाविध कारणं देत काहीही खाण्याचं टाळण्याचा प्रयत्न केला. न जाणो फट् म्हणता दंतहत्या व्हायची आणि मित्रमंडळींना आयताच विषय......

पण आज मात्र आमच्या ऋणानुबंधाने वेगळीच कलाटणी घेतली. एकदम माझी स्माईल (सो कॉल्ड ) किलिंगली बुटीफुल करून टाकली ऋने!! आता एकदम पहिल्या दिवसा सारखं तिचं माझं नातं ❤️ ❤️ झालं.

मागचे सगळे बंध उलगडले. नवे प्रेमाचे बंध निर्माण झाले.आज तिला तिच्या ब्लु फिल्म ची कमाल सांगितली. हसून हसून तिचीही भरपूर करमणूक झाली. ‘मोस्ट मेमोरेबल पेशंट’ असा खिताब मला तिने बहाल केला.

आता कोणाला नंबर पत्ता हवा असेल तर सांगा!! म्हणजे किलिंगली बुटीफुल स्माईल हवी असेल तर हं, बाकी निळं वगैरे नाही काही!!

# लकी_अनलकी

“काळं घेऊ नका गं काही सणाचं!!”

खरेदीला चाललोय म्हटल्याबरोबर सासूबाई बजावतात.

“आजी, काहीही सांगू नको हां! ब्लॅक कलर इज ऑलवेज इन ! फॅशन मधे असतं कायमचं! कधीच आऊटडेटेड होत नाही. आणि यू नो, ब्लॅक कलर हा सगळ्या रंगांनी मिळून बनतो. मग तो वाईट कसा?” ती सायन्स झाडते.

“अगं, अशुभ मानतात काळा रंग. फक्त संक्रांतीला चालतो.”

“हे बरय बर का तुम्हा मोठ्या लोकांचं! नियम करायचा नि मग पळवाटा शोधायच्या!”

“अगं शास्त्रात सांगितलय म्हणून सांगायचं.” नातीसमोर आजीचा आवाज मवाळ होतो.

“आजी हे सगळं शुभ, अशुभ, तुम्हीच मनात घेऊन बसता नि डोक्याला त्रास करून घेता बरं का. काळा रंग अशुभं! मांजर आडवी गेली अशुभं! टिटवी ओरडली अशुभं! पाल चुकचुकली अशुभं! भारद्वाज दिसला शुभं! मुंगुस दिसलं शुभं. मग घुशीला देखिल मुंगूस समजता अंधारात. संध्याकाळी नखं काढू नयेत. काय

म्हणतेस गं, ते, हं, तिन्हीसांजेला म्हणे. तिन्हीसांजेला केस नखं कापू नयेत. मग काय आणि शनिवारी तेल आणायचं नाही. दिवा विझला अशुभ. आला वारा नि विझला दिवा , लावायचा परत, एवढं काय त्यात. तू मात्र रात्रभर काळजी करतेस. काही लॉजिक आहे का?

आज आजींची नात जोशातच आहे. म्हटलं "चालू द्या!" मला तरी आजींचा मवाळ गोड आवाज कधी ऐकायला मिळणार ना?

मी आपली गपचूप बसून ऐकत असते.

"हं , आणि ते काय म्हणता तुम्ही डोळा ट्विच करतो त्याला?"

"डोळा काय करतो?" आजी न कळून म्हणते.

"ते गं डोळा फडफडतो का काय ते."

"हं स्त्रियांचा डावा डोळा लवला की शुभं. पुरुषांचा उजवा शुभं! बायकांचा उजवा अशुभ!पुरुषांचा...."

"बासच बासच, काहीही आहे हां हे. अगदीच काहीही..... मोस्ट इल्लोजिकल थींग आय हॅव एव्हर हर्ड!!"

अगं, अनुभवाने सांगतेय. कित्येकदा असं झालय. सकाळी डावा डोळा लवला आणि दुपारी चांगली बातमी कळली."

"धीस इज शियर नॉनसेन्स!! लेक चांगलीच उसळते."

"हं... पुरे ! माझा एवढा 'हं' पुरतो लेकीला!"

"सॉरी आजी, पण मला खरंच नाही पटत या गोष्टी."

मग दोघी जरा गप्प बसतात.

माझं मन विचारात गुंततं. खरंच काय असेल याच्या मागचं कारण?

कारण आजी जे सांगतात ते खोटं नाही. बऱ्याचदा "आज डावा लवतोय गं, काय चांगली बातमी मिळतेय बाई?" असं त्यांनी म्हणावं आणि खरंच दुपारपर्यंत कुणाचा रिझल्ट, किंवा नोकरीत बढती, लग्न ठरल्याची बातमी असं काही कळावं. निदान कुणाचं पत्र तरी यायचच. पुर्वी अर्थात. अलिकडे पत्र येतात कुठे म्हणा!!

पण लेक म्हणते ते ही पटतच की.

मला वाटतं या गोष्टींवर विश्वास ठेवला तर तसं घडत असावं का?

म्हणजे या घटनांच्या बऱ्या वाईट सगळ्याच , काहीतरी प्रकारच्या लहरी आपल्यापर्यंत पोहोचतच असतात का? मग आपण ज्या गोष्टीवर विश्वास ठेवतो त्या मार्फत आपलं शरीर ते सेन्स करून त्याप्रमाणे आपल्यापर्यंत निरोप पोहोचवत असेल का? कारण कोणी खोटं नाही सांगत हे नक्की. जे असेल ते असो.

चूक की बरोबर? आपला यावर किती विश्वास आहे?

ठरवणं खरंच मुश्किल. एखादी आपत्ती येऊन आपटली की खरं मन कळतं बऱ्याचदा. सगळे विश्वास, अंधविश्वास बाहेर निघतात. पराकोटीचा नास्तिक माणूस क्षणात आस्तिक बनून भाविकतेने देवापुढे हात जोडून उभा दिसतो. सर्व जे पुर्वी अंधविश्वास वाटत होते त्यावर विश्वास ठेऊ पहातो.

तर कधी उलटही होतंच की. अत्यंत भाविक माणूस एखाद्या जवळच्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर किंवा अशाच काही मोठ्या धक्क्यानंतर पूर्णपणे नास्तिक बनून देवाला शिव्या घालतानाही दिसतो. सब झूट है चा नारा लावतो.

अध्यात्म, गुरू, यावर सतत चेष्टेवजा शेरे मारणारी व्यक्ती कोणी साधासा जादूचा प्रयोग दाखवतं आणि मग त्या बुवाच्या पूर्ण कह्यात तो माणूस जाताना दिसतो.

सगळंच विचार करायला लावणारं.

मी विचारात गुंतलेली असतानाच लेकीला मूळ मुद्दा आठवतो.

आई चल, तयार हो. आणि हो, तुझा लकी ड्रेस घाल हां, मला मस्त टॉप्स मिळायला हवेत. !!

आम्हा सासूसुनांच्या भिवया क्षणात वर चढतात!!

चाणाक्ष लेकीच्या ते लगेच लक्षात येतं. मग ओशाळते जरा. पण मग लगेच सावरून घेत म्हणते “असं चालतं गं थोडं लकी , अनलकी वगैरे.”

“म्हणजे तुझ्यासाठी लकी, माझ्या पर्ससाठी अनलकी, असा ड्रेस घालू म्हणतेस का?”

मग तिघीही हसतो मनमुराद!

“तेवढं काळं वगळा गं!” जिना उतरताना मागून आवाज येतो.

# ट्रॅफिक

पर्स घेतली, फोन घेतला, गॉगल? स्कार्फ, आज हवाच. चक्कं उन पडलंय. चला, उशीर झालाच किती आटापिटा केला तरी.

अगं, हो की सुरू, का उगाच लाथा खायच्या म्हणते मी? आधीच झालाय उशीर. हं, नशीब, फरफरला सायलेन्सर एकदाचा, अरे देवा, ॲक्सीलरेटरची वायर बाद झाली की काय? किती त्या हॅंडलचं नरडं पिळलं तरी पुढे जायचं नाव नाही. परत येतानाच गॅरेजमधे टाकायला हवीय.

अरे ए मुला, असा कॉर्नरवर मधेच उभा राहिलास तर मी वळणार कशी? कठीणच करतात ही आजकालची पोरं. कानात एकदा वायरी खुपसल्या की कसलं भानच नाही!

अरे ए, कसला सुळकन माशासारखा आडवा गेला हा बाईकवाला , स्वत:चा आणि बाईकचा रस्त्याशी तीस अंशाचा कोन करत पार उजवीकडून येऊन माझ्या गाडीला आडवा येत पार डावीकडे! परत विरुद्ध दिशेने तीस अंशाचा.... देवा.... वाचव रे बाबा.

सिग्नल का बंद आहे हा आज? अरे अरे, कसे रे क्षणात जाम करतात रस्ता. बसा आता असंच धूर खात गाडीवर.

ए अरे अरे ! ओह, माय गॉड!!!! हुश्श्य ! म्हटलं संपलंच आता सगळं. ती पिएम टी बस पार माझ्या स्कुटीचा मुकाच घ्यायला निघालेली.

डीप ब्रीद मधू, डीप ब्रीद! घाबरून गाडीच काय मी च बंद पडायची वेळ आली.

का सगळी माणसं एकाच वेळी बाहेर पडलीत आज? घरी बसावं की कोणीतरी.

अगं, हो, हो, झाशीची राणी, जायचंच आहे सगळ्यांनाच पुढे, काय तुलाच एकटीला घाई आहे काय?

अरे थांब रे जरा, किती हॉर्न मारशील? सिग्नल सुटला तर काय हनुमानासारखं उड्डाण करावं की काय माझ्या गाडीनं? पुढचे हलतील तेव्हाच मी जाईन ना पुढे?


घ्या आता, तुमचीच कमी होती, ओ मावशी, रस्ताय हो, फुटपाथ नाही. चला की जरा बाजूने. बघा तुमच्या नादात पडला ना लाल सिग्नल.

हुश्श्य! पोहोचले बाई एकदाची. देवा, परत जाताना माझी मलाच गाडी चालवत जायचय, वाचव रे बाबा.

केवढी गर्दी वाढली पुण्यातली!


**सौ. मधू शिरगांवकर यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके**


कव्हरवर क्लिक करताच पुस्तके उघडतील










## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १३ वे वर्ष.

## सौ. मधू शिरगांवकर यांचे ईसाहित्यवर हे सहावे पुस्तक.

सौ. मधू शिरगांवकर एक नामवंत लेखिका आहेत. अनेक नियतकालिकांतून त्यांच्या कथा व इतर साहित्य प्रकाशित होत असते. सहसा त्यांची लिखाणाची शैली प्रासादिक असते. चित्रपटाप्रमाणे त्यांच्या कथा उलगडत जातात, त्याही त्यांच्या कथा गूढ असल्या तरी अंधश्रद्धा जोपासणाऱ्या नसतात. एक थेट आणि ठळक असा सामाजिक संदेश त्यांच्या कथांतून दिला जातो. महिला सक्षमीकरण हे त्यांच्या साहित्यातील एक अधोरेखित मूल्य आहे. आणि या पुस्तकात तोच संदेश या पुस्तकात त्यांनी खेळीमेळीच्या वातावरणातून दिला आहे. पण या लेखांमधे त्यांची शैली आपल्या नेहमीच्या मतकरी वळणाला सोडून पुल महामार्गाने जाते. त्यांच्या लेखाणीचे हे वैशिष्ट्य अभ्यासण्याजोगे आहे.

सौ. मधू शिरगांवकर यांच्यासारख्या ज्येष्ठ साहित्यिका आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर

दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत.

त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।